CMYK




# पार्श्वभूमी




बीड वर्ष ३६ वे अंक ९८ वा फोन २३०१०१ दिनांक ८ मार्च २०२६ रविवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# डीपीडीसीत दिलेले निधी वाटपाचे आदेश रद्द करा

# हायकोर्टाची पालकमंत्री पंकजाताई मुंडेंना चपराक

**बीड दि.७ (प्रतिनिधी):– जिल्हा नियोजन समिती अर्थात डीपीडीसी महाराष्ट्र राज्य जिल्हा नियोजन समिती कायदा १९९८ च्या तरतुदीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत जिल्हा परिषद, पंचायतराज संस्थांच्या नियमांकडे डोळेझाक करुन पालकमंत्री पंकजाताई मुंडे व जालन्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने कामाच्या निधीचे वाटप आपल्या मर्जीतील लोकांना केल्याचा आरोप मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठात दाखल याचिकेद्वारे करण्यात आला आहे. या प्रकरणात न्यायालयाने पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.**

जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये निधींचे वाटप करत असतांना जालन्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे आणि जिल्हाधिकारी यांनी पंचायतराज संस्थांनी केलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात राज्य शासन, पालकमंत्री पंकजाताई मुंडे, विभागीय



आयुक्त, जालना जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा नियोजन समितीचे प्रमुख अधिकारी व इतरांना प्रतिवादी करण्यात आले असून त्यांना नोटीस बजावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जालन्यातील जिल्हा नियोजन बैठकीचे गठण नियमबाह्य पंचायतराज संस्थेने केलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाची निवड, पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी निधी वाटपाचे दिलेले आदेश रद्द करावे अशी मागणी जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रीत सदस्य असलेल्या भाऊसाहेब गोरे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठात दाखल याचिकेद्वारे केली होती. ॲड.राजेंद्र डासाळकर यांच्या मार्फत दाखल केलेल्या याचिकेत डीपीडीसीवर गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. जालना जिल्हा नियोजन समिती कलम ३ महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती कायदा १९९८ प्रमाणे गठीत केलेली नसून ती अवैध आहे. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या निधी वाटपाचे आदेश रद्द करण्यात यावेत अशी विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. यावर खंडपीठाच्या न्यायमूर्ती विभा कनकनवाडी आणि न्यायमूर्ती वेणेगावकर यांनी प्रतिवादी राज्य सरकारसह इतरांना नोटीसा बजावल्या आहेत. मंठा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते भाऊसाहेब गोरे यांनी याचिकेत केलेल्या गंभीर आरोप नोंदवलेल्या आक्षेपांची नोंद घेत खंडपीठाने संबंधितांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत. गेल्या डीपीडीसीमध्ये गोरे हे राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत होते.

## सर्वच बँकांचे पीककर्ज होणार माफ



- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही**
- **आतापर्यंतची सर्वात चांगली कर्जमाफी असल्याचा दावा**

नागपूर दि.७ (वृत्तसेवा):- ज्या बँकांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, त्या बँकांतून पीक कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यामुळे सरकारच्या कर्जमाफीचा लाभ कोणकोणत्या शेतकऱ्यांना मिळणार? याविषयीची संभ्रमावस्था संपुष्टात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण या कर्जमाफीचा लाभ कोणत्या बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जावर मिळेल याविषयी वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात होते. पण आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः याविषयीची स्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, मी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यामुळे त्याबद्दल कुणाच्याही मनात संभ्रम नाही. काही लोक वेगवेगळ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करतात. कुणी म्हणतो राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, कुणी म्हणतो जिल्हा बँकेचे होणार नाही, कुणी म्हणतो या सोसायटीची होणार नाही, कुणी म्हणतो त्या सोसायटीची होणार नाही.

पण सरकारने पीक कर्ज देण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही बँकेने दिलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की, माफी शेतकऱ्याला द्यायची आहे बँकेला नाही. त्यामुळे या निर्णयाचा फायदा शेतकऱ्याला व्हावा यासाठी काम सुरू आहे. आम्ही यापूर्वीच सांगितले आहे की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. पान २ वर

### माहिती व्हायरल करणाऱ्याविरुद्ध एसआयटी कारवाई करणार

## महादेव मुंडे खून प्रकरणाशी संबंधीत सनसनाटी निर्माण करणाऱ्यांना चपराक

**बीड दि.७ (प्रतिनिधी):– परळी तालुक्यात दोन वर्षापुर्वी घडलेल्या आणि संपूर्ण राज्यभर गाजत असलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाशी संबंधीत खोटी माहिती किंवा अफवा पसरवून सनसनाटी निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा बीडच्या विशेष पथकाने (एसआयटी) दिला आहे. या प्रकरणाशी संबंधीत अनेक चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. मात्र त्याचे सर्व अहवाल अत्यंत गोपनीय स्वरुपाचे असल्याचे एसआयटीने स्पष्ट केले आहे.**

परळी तुलक्यातील भोपळा येथील महादेव दत्तात्रय मुंडे यांचा दि.२१ ऑक्टोबर २०२३ रोजी खून झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने विशेष तपास पथक यांच्या



मार्फत या प्रकरणाचा सखोल तपास सुरु आहे. तपासा दरम्यान काही संशयीत इसमांच्या पॉलोग्राफ/लाय डिटेक्टर/ब्रेन मॅपींग तसेच नार्को ॲनालिसीस अशा मानसशास्त्रीय चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. सदर मानसशास्त्रीय चाचण्यांचे अहवाल हे अत्यंत गोपनीय स्वरुपाचे असून ते तपास यंत्रणेच्या अधिकृत अभिलेखात सुरक्षीत आहेत. सदर अहवाल कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस, माध्यमास अथवा सामान्य नागरिकास दाखविण्यात आलेले नाहीत किंवा याची कोणतीही माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये आणि जर कोणी खोटी माहिती पान २ वर

### पोलीस प्रशासनाने प्रत्येक प्रकरणात अशीच भूमिका घ्यावी

**बीड जिल्ह्यात एखाद्या घटनेवरुन अनेक तर्क–वितर्क लावून आरोप–प्रत्यारोप केले जातात. सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल करण्याची अक्षरश: स्पर्धाच लागते, त्यातून जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. एखाद्या प्रकरणात किती प्रमाणात भूमिका मांडावी आणि ती कशा पद्धतीने मांडावी याचे कसलेच भान रहात नाही, त्यामुळेच सोशल मीडियावरील पोस्टमुळे अनेकदा वाद देखील होत आहेत. महादेव मुंडे खून प्रकरणाशी संबंधीत जी काही माहिती सध्या व्हायरल होत होती, आरोप केले जात होते त्याला कुठेतरी ब्रेक लावण्याचे काम बीडच्या एसआयटीने केले आहे. पोलीस प्रशासनाने प्रत्येक प्रकरणात अशीच भूमिका घेणे आवश्यक आहे. एखाद्या घटने विषयीचा खुलासा तत्परतेने झाल्यास पुढील वादग्रस्त मुद्दे टळू शकतात. त्यामुळे यापुढे बीड पोलिसांनी अशा गंभीर घटनांच्या प्रकरणातच नव्हे सोशल मीडियावरील वादग्रस्त पोस्टच्या अनुषंगाने देखील अशाच पद्धतीने कारवाईची भूमिका घेणे आवश्यक आहे.**

## भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या हरिभाऊ शेळकेंवर प्राणघातक हल्ला

बीड दि.७ (प्रतिनिधी):- भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठविणारे शिवसेना शिंदे गटाच्या शेतकरी सेनेचे तालुका प्रमुख हरिभाऊ शेळके यांच्यावर वांगी (ता.बीड) येथे अज्ञात व्यक्तिंनी



प्राणघातक हल्ला केल्याची घटना दि.७ मार्च रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. हरिभाऊ शेळके गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बीड तालुक्यातील वांगी येथील भ्रष्टाचाराच्या विरोधात शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख हरिभाऊ शेळके यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराबाबत गटविकास अधिकाऱ्यांकडे पुराव्यानिशी तक्रार केली होती. तक्रार केल्याच्या रागातून हरिभाऊ शेळके यांच्यावर वांगी गावात अज्ञात व्यक्तिंनी हल्ला केला. यावेळी शेळके यांना मारहाण करत रुमालाने त्यांचा गळा आवळून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न देखील केल्याचे सांगितले जात आहे. पान २ वर

## वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला

बीड दि.७ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईत बीड जिल्हा वाहतूक शाखेने मोठी कारवाई करत वाळूने भरलेला हायवा जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.



पोलीस हवालदार अजीनाथ विष्णु मुंढे जिल्हा वाहतूक शाखा, बीड यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार सपोनि सानप, पोह. तांदळे व पोशि. कदम यांच्यासह अवैध धंद्यांवर कारवाईसाठी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. माहितीनुसार मालेगाव ते उमापूर रोडवरून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा जाणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा रचला. मौजे मालेगाव ते उमापूर मार्गावरील कॅनॉलजवळ दोन पंचांना बोलावून पोलिसांनी पाहणी सुरू केली. त्याचवेळी मालेगावकडून उमापूरकडे जाणारा भारत बेंझ कँपनीचा वाळूने भरलेला हायवा (MH-23 AU-3596) पोलिसांना दिसताच त्याला थांबवून ताब्यात घेण्यात आले. चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव जावेद युसुफ पठाण (रा. महारटाकळी, ता. गेवराई, जि. बीड) असे सांगितले.

पोलिसांनी वाळू वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे कोणताही अधिकृत परवाना आढळून आला नाही. त्यानंतर पंचांसमक्ष वाहनाची पाहणी केली पान २ वर

### आयजी विरेंद्र मिश्र यांनी सर्व ठाणे प्रभारींची घेतली बैठक

## गुन्ह्यांमध्ये दोष सिद्धी वाढविण्यासाठी एआयचा वापर करण्याच्या सूचना



बीड दि.७ (प्रतिनिधी):- छत्रपती संभाजी नगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र बीड जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक तपासणीसाठी बीडमध्ये आलेले आहेत. दि.७ मार्च रोजी विरेंद्र मिश्र यांनी जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांची गुन्हे आढावा बैठक घेतली. गुन्ह्यांच्या तपासातील त्रुट्या, बारकावे, न्याय निर्णयांचे वाचन करण्यासाठी आणि गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धी वाढविण्यासाठी एआय (आर्टिफिशीयल इंटेलिजन्स) चा वापर करावा अशा सूचना त्यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या.

बीड येथील पोलीस मुख्यालयात समारंभ कवायत, त्यानंतर पीटी परेड, लाठी कवायत, स्वयंचलीत हत्यारांची कवायत, दंगा काबूत कवायत घेण्यात आली. सर्व प्रात्याक्षिकांमध्ये आयजी विरेंद्र मिश्र यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारींची आढावा बैठक घेण्यात आली. सर्व पोलीस ठाण्यांसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. २०२५ पुर्वी बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या तणावपुर्ण परिस्थितीला पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी त्यांच्या अधिनस्थ अधिकारी व अंमलदार यांना सोबत घेऊन जिल्ह्यातील तणाव कमी करुन पान २ वर

### मोटारसायकल चोरीचा पर्दाफाश करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

**गेवराई पोलीस स्टेशनने मोटारसायकल चोरी प्रकरणात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बाबत पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यासह अधिकारी व अंमलदारांचा आयजी विरेंद्र मिश्र यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्याच बरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.बंटेवाड व अधिकारी, अंमलदारांचा चांगल्या कामगिरीबद्दल आयजींच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**




बीड दि.७ (प्रतिनिधी):- जुना मोंढा भागातील संतोषीमाता देवी मंदिर ते बालाजी मंदिर पर्यंतच्या नालीची व्यवस्थीत साफसफाई होत नसल्यामुळे गटाराचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

**पाहिजेत**

**रुम सर्व्हिससाठी व साफसफाईसाठी 2 मुले पाहिजेत**

गरजुंनी संपर्क करावा. वेळ:दु.12 ते 4.00

**हॉटेल साई पॅलेस**

जालना रोड, बीड.

P.P.

## मार्चच्या पहिल्या आठवड्यात सोनं ८७२० रुपयांनी स्वस्त

### तर चांदीच्या दरात २९ हजारांची घसरण

मुंबई दि.७ (प्रतिनिधी):- मार्चच्या पहिला आठवडा सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरला आहे. सोने किंवा चांदीच्या दरात घसरण झाली. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या आकडेवारीनुसार, २ ते ६ मार्च दरम्यान किमतीत मोठी घट नोंदवली गेली. काही दिवशी सकाळी दरांमध्ये तेजी दिसून आली होती पण दिवसाअखेर किमतीमध्ये घसरण झाली होती.

सोन्याच्या दरात झालेली घसरण

इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या डेटानुसार, या आठवड्यात सोन्याच्या किमतींमध्ये पान २ वर

## ना.संजयभाऊ राठोड यांनी बंजारा समाजाला न्याय मिळवून द्यावा

### संतोषभैया पवार यांची मागणी



वडवणी दि.७ (प्रतिनिधी):- हैद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एस टी प्रवर्गात समावेश करा बंजारा समाजाची लढाई आता मा.ना. लोकनेते संजय भाऊ राठोड यांच्या माध्यमातून सूरू आहे आणी ती आता आंतीम टप्यात असून शासनाने जी कमिटी गठीत केली आहे त्या माध्यमातून समाजाला लवकर एस टी प्रवर्गात समावेश करावा अशी मागणी बंजारा युवाशक्ती चे अध्यक्ष संतोषभैय्या पवार यांनी मृदा व जलसंधारण मंत्री संजय भाऊ राठोड यांच्या समोर काल गेवराई तालुक्यातील रामराव महाराज गड, काठोडा येथे आयोजित बंजारा मेळावा निमित्त केली आहे. पान २ वर

CMYK




आंतरराष्ट्रीय महिला दिवस दरवर्षी ८ मार्च रोजी जगभरातील विविध क्षेत्रात महिलांबद्दल सन्मान प्रशंसा आणि प्रेम आदर व्यक्त करत महिलांच्या आर्थिक , राजकीय आणि सामाजिक उपलब्धी व संघर्षाच्या उपलक्ष्यात एक उत्सव म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संविधानात स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जात नाही. कायद्यासमोर समानता हे एक राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे. पण १९१० पूर्वी स्त्रीयांना शिक्षण , मतदान हक्क , नोकरी या सर्व उद्दिष्टांपासून वंचित ठेवणारा समाज होता. या सर्व घटकांच्या रुढी, परंपरेच्या नावाखाली स्त्री हा घटक बळी पडत होता या सर्व घटकांना मागे टाकून स्त्रीयांनी स्वतःच्या हक्कांसाठी लढा पुकारला स्त्रियांनी संघटीत होऊन स्वतः अधिकार मागण्यासाठी केलेला संघर्ष हा पहिला संघर्ष मानला जातो म्हणून १९१० पासुन जागतिक महिला दिन साजरा केला जातो यात महिलांना मतदान, शिक्षण , समाजकारण,राजकारण ,प्रशासन, क्रीडा, कला या सर्वच क्षेत्राची दारे उघडी झाली आणि खरी सुरुवात झाली ती या दिवसापासून जेथे महिलांना उंच उडण्याची शक्ती मिळाली. शिक्षणाच्या जोरावर महिलांनी अनेक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आपले स्थान मिळविले.

भारताच्या पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले, महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, महिला इंजिनियर अय्यल सोमय्याजुला ललिता, पंतप्रधान इंदिरा गांधी, महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, महिला राज्यपाल सरोजिनी नायडू इतिहासाच्या कालखंडापासून पाहिले तर या सर्व महिलांचा उल्लेख आपण पाहतो त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना मिळालेली स्थाने आपणाला झुगारून चालणार नाही.

देशाचा अभिमान बाळगून देशासाठी लढणाऱ्या महिला म्हणजे कल्पना चावला, कारगिल गर्ल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुंजन सक्सेना तसेच पहेलगाम आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ ऑपरेशन सिंदूर मध्ये देशासाठी लढणारी कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर म्हणून काम केलेली व्योमिका सिंग पाहून एखादया पुरुषाच्या कामगिरीला लाजवेल अशी देशभक्ती. सर्वच क्षेत्र पाहिले तर महिलांनी आपले वर्चस्व दाखवून दिले आहे पण एकविसाव्या शतकात पाहिले तर महिलांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे त्यात आर. जी. कर कॉलेज मधील महिला डॉक्टर हत्या प्रकरण, जळगाव हत्या प्रकरण असे कित्येक प्रकरण असतील यातून महिलेचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. समाजात वावरत असताना प्रत्येकाने महिलांना सन्मानपूर्वक वागणूक देणे हे समाजाचे कर्तव्य आहे हे सर्वांनी लक्षात ठेवावे कारण स्त्री ही देखील एक समाजाचा घटक आहे. समाजाला पूर्ण करणारा घटक म्हणून स्त्रीयांकडे पाहिले तर समाज आणखी प्रगतीशील देशाकडे वाटचाल करेल. आजच्या या महिला दिनानिमित्त सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्या महिला भगिनींना मानाचा मुजरा.



**श्रीमती कविता चव्हाण**
**मुख्याध्यापिका वसंतनगर पाचेगाव ता.गेवराई**

# पुढचे दोन दिवस राज्यात उष्णतेचा हाय अलर्ट

मुंबई दि.७ (प्रतिनिधी):- राज्यात आता प्रचंड उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून चाळीशी गाठतानाचे चित्र आहे. दरम्यान हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यभर उष्णतेचे अलर्ट दिले आहेत. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यांना उष्ण व आर्द्र हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस राज्यभरात कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. विदर्भात पुढील दोन दिवसांत पारा तापणार असून तीन जिल्ह्यांना उन्हाचा तडाखा बसणार आहे. पुढील दोन दिवसांत राज्यातील कमाल तापमान दोन ते तीन अंशांनी वाढणार आहे. महिन्याच्या अखेरीस तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे जाईल असा अंदाज हवामानतज्ज्ञ एस. डी. सानप यांनी वर्तवला आहे.



रीया काविना व अमीत गगनानी यांच्या लग्ना निमीत्त आशीर्वाद देताना अमर शहीद संत कंवरराम मीशनचे अध्यक्ष डॉ.जेसवाणी, राम मोटवाणी, ईश्वर टेकवाणी, सतीष तलरेजा व जितेंद्र काविणा.

# खाद्य पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रंगांमधील घातक घटकांच्या नियंत्रणासाठी धोरण आणणार

## - अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ -

मुंबई दि.६ (प्रतिनिधी):- विक्री होणाऱ्या खाद्य पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध रंगांमध्ये असलेल्या घातक घटकांबाबत चर्चा करुन खाद्यरंगांबाबतचे धोरण ठरविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल. या बैठकीस विधानसभेतील या क्षेत्रातील जाणकार सदस्यांना निमंत्रित केले जाईल. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या कायद्यांमध्ये आवश्यक बदल करण्यासंदर्भात प्रधानमंत्री मोदी यांना विनंती करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत सांगितले.




सदस्य महेश शिंदे यांनी खाद्यपदार्थांमध्ये रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केले जाणारे घातक कृत्रिम रंग वापरले जात असल्याबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली. सदस्य विक्रम पाचपुते, सुधीर मुनगंटीवार, प्रवीण दटके, राजेश पवार, हिरामन खोसकर यांनी सहभाग घेतला.मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत असलेले कायदे केंद्र शासनाचे आहेत. या कायद्यांमध्ये आवश्यक बदल करुन खाद्यपदार्थांमध्ये वापरले जाणारे घातक रंग आणि त्यातील घटक यावर नियंत्रण आणण्यासाठी प्रधानमंत्री यांना राज्य शासनाच्या वतीने पत्र पाठवून विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर राज्य शासनाच्या वतीने खाद्य रंगांबाबतचे धोरण ठरविण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत चर्चा करण्यात येईल. राज्य शासनाच्या वतीने सर्व हॉटेल्सना खाद्यपदार्थांच्या मेन्युमध्ये त्यात वापरल्या जाणाऱ्या घटकांचा स्पष्ट उल्लेख करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सध्या तीन प्रयोगशाळा आहेत, या व्यतिरिक्त आणखी तीन लॅब स्थापन करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे विनंती करण्यात येईल, असे सांगून नरहरी झिरवाळ यांनी सदस्य महेश शिंदे यांनी मांडलेल्या अभ्यासपूर्ण माहितीची पुस्तिका तयार करावी, विभागामार्फत त्यास साहाय्य करण्यात येईल, असे सांगितले. विभागाच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# यूपीएससीमध्ये पांगरीच्या हर्षवर्धन तिडके यांचे यश

## राष्ट्रीय पातळीवर ३५५ वी रँक; सर्वोच्च नागरी सेवेत स्थान निश्चित

बीड दि.७ (प्रतिनिधी):- परळी तालुक्यातील पांगरी (गोपीनाथगड) येथील हर्षवर्धन अशोक तिडके यांनी संघ लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर ३५५ वी रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे त्यांनी देशातील सर्वोच्च नागरी सेवेत आपले स्थान निश्चित केले आहे.ग्रामीण भागातून शिक्षण घेत कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हर्षवर्धन तिडके यांनी हे यश मिळवले. त्यांनी मुंबई येथील आयआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून शिक्षण पूर्ण केले असून, यूपीएससी परीक्षेची संपूर्ण तयारी त्यांनी स्वतःहून केली. हर्षवर्धन तिडके यांचे वडील अशोक तिडके हे कृषी विभागात अधिकारी असून, त्यांच्या मार्गदर्शनाचाही त्यांना लाभ झाला. हर्षवर्धन यांच्या या यशामुळे पांगरी (गोपीनाथगड) गावासह परळी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी अनेकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.



# एसटीत चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

## ■ परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती ■

मुंबई दि.७ (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते.

त्या अनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. तसेच वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे. ही तपासणी नियमितपणे होत आहे की नाही, याची खात्री स्थानक प्रमुखांनी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय बसस्थानक व आगार परिसरातील चालक, वाहक आणि विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित विभागातील पालक अधिकाऱ्यांनी आगार व बसस्थानक भेटीदरम्यान या उपाययोजनांची अंमलबजावणी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# बीएसएनएलच्या सर्व यूनियन आणि असोसिएशनने दिले खा.कल्याण काळे यांना थर्ड पी आर सी बाबत निवेदन

छ. संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी):- केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने पी एस यू मधील कर्मचाऱ्यांना वेतन करार लागू करण्यासाठी कंपनीच्या नफ्याची अट लागू केली आहे. त्यामुळे बीएसएनएल कर्मचारी व अधिकारी यांना तिसरा वेतन करार देण्यास गेल्या ९ वर्षापासून विलंब झालेला आहे. वास्तविक कंपनीचा तोटा हा सरकारी धोरणामुळे होत असून त्यामध्ये कर्मचारी अधिकारी यांचा कोणताही दोष नाही. अशा प्रकारची स्पष्ट भूमिका माजी केंद्रीय मंत्र्यांनी सुद्धा मांडलेली आहे. त्यामुळे बीएसएनएल सारख्या संवेदनशील व धोरणात्मक महत्व असलेल्या कंपनीसाठी नफ्याची अट शिथिल करणे आवश्यक असून केंद्रीय मंत्रिमंडळाने तातडीने हा निर्णय घेणे गरजेचे आहे. यासाठी खासदार महोदयांनी येत्या संसद अधिवेशनात आवाज उठवावा अशी विनंती छ. संभाजीनगर बीएसएनएल मधील सर्व यूनियन आणि एसोसिएशन च्या वतीने आज खा.कल्याण काळे यांना थर्ड पी आर सी बाबत सविस्तर निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी मा. खा. काळे यांनी सकारात्मकपणे आपली भूमिका समजावून घेतली आणि याबाबत संसदेत योग्य तो प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शिष्टमंडळात कॉम जॉन वर्गीस, कॉम रंजन दाणी,कॉम रमेश दुबिले, श्रीमान कुरील, कॉम नंदू पाटील, श्रीमती आर एस राख, कॉम भान सिंग, आयू बी आर गणकवार, श्रीमान शिवाजी वाघ, श्रीमान चंद्रगुप्त लांडगे आदींचा समावेश होता.

# शेकडो ठेवीदारांची कोटयावधी रूपयांची फसवणूक करत फरार झालेल्या श्री मंगलनाथ मल्टिपल निधीच्या केशव पंडितला अखेर पुण्यातून केली अटक



गेवराई दि.७ (प्रतिनिधी) :- बीड जिल्ह्यात मल्टिस्टेट, निधी अर्बन, पतसंस्था बँकांचे घोटाळे बाहेर निघत असताना बीडमधून ज्ञानराधा घोटाळ्यानंतर शेकडो ठेवीदारांच्या कोट्यावधी रुपयांची फसवणूक करून फरार झालेल्या केशव शेषनारायण पंडित याला अखेर पुण्यातून अटक करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई शहरांमधील मंगलनाथ मल्टिपल निधी व श्री मंगलनाथ मल्टिपल निधी अशा वेगवेगळ्या दोन बँकेचे लायसन काढून याच माध्यमातून केशव पंडित याने कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली होती. या बँकेचा अध्यक्ष फसवणूक करून गेल्या अनेक महिन्यांपासून फरार होता. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार व गुन्हे दाखल आहेत. अखेर आर्थिक गुन्हे शाखेच्या माध्यमातून पुण्यातून केशव पंडित याला अटक करण्यात आली आहे. किमान आता तरी ठेवीदारांना न्याय मिळेल अशी अपेक्षा ठेवीदार व्यक्त करत आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील श्री मंगलनाथ अर्बन मल्टिपल पतसंस्थेतील ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी संस्थापक अध्यक्ष केशव शेषनारायण पंडित यांना बीड पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. कोट्यावधी रुपयांच्या अपहारप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल होता. अनेक दिवसांपासून ते पोलिसांना गुंगारा देत होते. या कारवाईमुळे जिल्ह्यातील मल्टिस्टेट पतसंस्थेच्या अपहारप्रकरणी खळबळ उडाली आहे.

पान १ वरून

## महादेव मुंडे खून प्रकरणाशी संबंधीत माहिती

प्रसारीत करीत असेल तर त्याच्याविरुद्ध कायदेशीर तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येईल असे विशेष तपास पथक बीड यांनी स्पष्ट केले आहे. सदरील गुन्ह्याचा तपास हा एसआयटी मार्फत योग्य पद्धतीने व पारदर्शकरित्या कायदेशीर प्रक्रिये प्रमाणे सुरु असून तपासाच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची सखोल पडताळणी करण्यात येत असल्याचे बीड येथील विशेष तपास पथकाच्या तपासी अधिकाऱ्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून महादेव मुंडे खून प्रकरणाशी संबंधीत अनेक दावे,प्रतिदावे होऊ लागले आहेत. ब्रेन मॅपींग आणि नार्को टेस्टमध्ये काय काय आहे या माहितीवरुन देखील आरोप होऊ लागले आहेत, त्या पार्श्वभूमीवर बीडच्या एसआयटीने थेट कारवाईचा इशारा देत घेतलेली भूमिका या मुद्यावरुन सनसनाटी निर्माण करणाऱ्यांना चपराक लावणारी आहे.

## हरिभाऊ शेळकेंवर प्राणघातक हल्ला

या हल्ल्यात हरिभाऊ शेळके गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

## सर्वच बँकांचे पीक कर्ज होणार माफ

त्यामुळे आता ही घोषणा बजेटमध्ये करण्यात आल्यामुळे पुढच्या कारवाईला सुरुवात होईल. समिती यावर काम करत आहे. ही समिती यासंबंधीच्या सगळ्या गोष्टी सांगेल. मी एवढेच सांगतो की, ही कर्जमाफी यापूर्वीच्या सर्वच कर्जमाफीच्या निर्णयांहून चांगली आहे.

## आयजी विरेंद्र मिश्र यांनी घेतली बैठक...

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नागरिकांसाठी सुरु केलेला प्रकल्प संवाद, प्रकल्प सुगम संपर्क, नागरिकांना भेटीसाठी ठरवून दिलेली वेळ, समाधान ४८, पोलीस आपल्या बांधावर, तक्रार निवारण दिन तसेच विविध समाजपयोगी उपक्रम या अनुषंगाने बीड जिल्हा पोलीस दलाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या परिवर्तन पुस्तिकेचे आयजी विरेंद्र मिश्र यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. परिवर्तन पुस्तिकेचे त्यांनी कौतुक केले असून सन २०२५ या वर्षात बीड जिल्हा पोलीस दलाने केलेल्या कामगिरीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

## मार्चच्या पहिल्या आठवड्यात सोनं स्वस्त

सातत्याने घसरण होत राहिली. सोमवार २ मार्च रोजी सोने १,६७,४७१ रुपये प्रति १० ग्रॅम होते, जे शुक्रवारी १,५८,७५१ रुपयापर्यंत कमी झाले. संपूर्ण आठवड्यात सोन्याच्या किमतीत सुमारे ८,७२० रुपये प्रति १० ग्रॅमची मोठी घट झाली आहे. आठवड्यातील व्यवहाराच्या प्रत्येक दिवशी सोन्याचे दरात घसरण नोंदवण्यात आली, ज्यामुळे हे १.६० लाख रुपयांपेक्षा कमी झाले.

## वाळू वाहतुक करणारा हायवा पकडला...

असता हायवामध्ये सुमारे ब्रास वाळू आढळून आली.भारत बेंझ कँपनीचा हायवा, ६ ब्रास वाळू असा एकूण २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेला हायवा व वाळू पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात आणली. विनापरवाना वाळू वाहतूक करणारा हायवावर करवाई केल्याने चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या खळबळ उडाली आहे.या प्रकरणी हायवा चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही करवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा सुभाष सानप, पो.हे.मुंडे, पो.हे.तांदळे, पो. हे. कदम यांनी केली.

## ना.संजयभाऊ राठोड यांनी बंजारा समाजाला न्याय मिळवून द्यावा

याविषयी अधिक माहिती अशी की काल गेवराई तालुक्यातील रामराव महाराज गड काठोडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बंजारा समाजाच्या मेळाव्याला विराट स्वरूपात या मेळाव्यास महाराष्ट्र राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री ना् संजय भाऊ राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यात एसटी आरक्षणाचा मुद्दा समाजाच्या वतीने लावून धरण्यात आला, राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटर तात्काळ लागू करुन मराठा समाजाला ओबीसी मध्ये ज्या पद्धतीने आरक्षणाचा अध्यादेश काढला, त्याच धर्तीवर अध्यादेश काढून बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती मध्ये समावेश करावा या मागणीसाठी बीड जिल्ह्यासह प्रत्येक जिल्ह्यामध्ये समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चे काढण्यात आली, या मोर्चाला बंजारा समाज बांधवांनो लाखोंच्या संख्येने सहभागी व्होते, तरी अद्याप समाजाला न्याय मिळणार नाही समाजांतील गोरगरीब उपेक्षित कष्टकऱ्यांच्या लेकरांना न्याय मिळवून देण्यासाठी आता संजय भाऊंनी मंत्रालयात याचा पाठपुरावा करत समाजाच्या जिव्हाळयाची मागणी मंजूर करून घ्यावी साहेब आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत फक्त समाजाला न्याय द्या अशी मागणी महाराष्ट्र राज्याची बंजारा यूवा शक्तीचे संस्थापक अध्यक्ष संतोष भैया पवार यांनी बोलून दाखविली.

पान ६ वरून

## गेवराई मतदार संघातील विकास कामांना ७२ कोटी रूपयाचा निधी मंजूर

करण्यात आला आहे. विधानसभा निवडणूकी दरम्यान मतदारांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आपण कटिबध्द असल्याची प्रतिक्रिया देऊन गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.विजयसिंह पंडित यांनी निधीच्या उपलब्धतेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संबंधित विभागाचे मंत्री आणि महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहेत. या निधीतील मंजूर कामे अतिशय दर्जेदार करून घेण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मतदार संघातील उर्वरित कामांनाही मंजूरीसह निधीच्या उपलब्धतेबाबत आपण सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## महिला दिनी होणार परळीतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव-कुलकर्णी

आहे. शहरातील नाथ चित्र मंदिर परिसरातील भागवत पॅलेसच्या सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून अंबाजोगाई येथील सामाजिक व रोटरी क्लबच्या अध्यक्षा सौ.रोहिणी पाठक, सौ.स्वाती विलासराव ताटे, सौ.उत्पलवर्णा अमोल कांबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव केला जाणार आहे अशी माहिती सा.परळी संचारचे संपादक अनंत कुलकर्णी यांनी दिली. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे कुलकर्णी यांच्यासह सौ.शितल अनंत कुलकर्णी व परळी संचार परिवाराच्या वतीने आवाहन त्यांनी केले आहे.

## शिफा आतार हिचा पहिला रोजा संपन्न

वर्गात शिक्षण घेत असून तिने एवढ्या लहान वयामध्ये धार्मिक संस्कार जोपासत आपला पहिला रोजा पूर्ण केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तसेच नातेवाईक व मित्रपरिवाराकडून तिचे अभिनंदन केले जात आहे. या मालिकेने एवढ्या लहान वयामध्ये आपल्या आयुष्यातील पूर्ण केलेला पहिला रोजा हा आदर्श लहान बालकांसाठी खरोखरच प्रेरणादायी ठरणारा आहे.

## महाराष्ट्र परिट (धोबी) सेवा मंडळाची गेवराई तालुका कार्यकारिणी जाहीर

शैक्षणिक मदत, शासकिय कामात सहकार्य व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी संघटनेमार्फत विविध उपक्रम हाती घेतले जातील तसेच सर्वसामान्यांच्या सुख दुःखात सदैव तत्पर राहिल असेही शेवटी त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. तर निवडीबद्दल अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सौ.प्रभा कोठारी यांचे निधन

निवासस्थान वरून त्यांची अंत्ययात्रा निघून अहिल्यानगर येथील नालेगाव अमरधाम येथे अंतिम संस्कार होईल.

## आ.धस यांच्या मागणीची दखल

राज्यातील चार कृषी विद्यापीठांत -ख सेंटर सुरू करण्यात येणार असून २०४७ पर्यंत राज्याचा कृषी जीडीपी ५०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती उत्पादन खर्चात २५ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कृषी स्टार्टअप, डेटा आणि डिजिटल सेवांना चालना देऊन शेती क्षेत्रात नवे उद्योग आणि संधी निर्माण होणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.कृषी संशोधनाच्या मुद्द्यावरही आ. धस यांनी सभागृहात लक्ष वेधले. राज्यातील अनेक कृषी विद्यापीठांमध्ये संशोधनासाठी आवश्यक मनुष्यबळाची कमतरता असल्याने नवीन वाण विकास, कीड-रोग नियंत्रण संशोधन आणि हवामान बदलाशी सुसंगत पिकांवरील अभ्यासावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. ही स्थिती सुधारण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी त्यांनी केली.शेती क्षेत्रात एआय तंत्रज्ञान, स्मार्ट सिंचन आणि संशोधन बळकटी या त्रिसूत्रीवर भर दिल्यास राज्यातील शेती अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

## शाळेचे गेट कोसळून विद्यार्थी जखमी

केली आहे. दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे. तसेच शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेचा तातडीने आढावा घेण्याचीही गरज व्यक्त केली जात आहे.

## पैठणच्या नाथ मंदिर परिसरात सोमवारी

सर्वत्र असहिष्णू व अनाचाराची परिस्थिती आहे. अशा विपरीत परिस्थितीत मानवजातीच्या कल्याणासाठी संत ज्ञानेश्वर महाराज यांनी विश्वात्मक शक्तीकडे मागीतलेले 'पसायदान' व त्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे. त्यानुसार दि. ९ रोजी सप्तमी पर्वावर नाथषष्ठी यात्रौत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २.३० वाजता 'सामुदायिक पसायदान पठण' करण्यात येणार आहे. यात्रा मैदान, गोदावरी नदीच्या काठावरील वाळवंट, घाट, बाजारपेठ, बसस्थानक व मुक्कामी दिंड्यांच्या फडावर असलेले भाविक यात एकाच वेळी सहभागी होणार आहेत. तसे नियोजन आजच्या बैठकीत करण्यात आले.

या धार्मिक उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे. असे आवाहन संत एकनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष तथा आमदार विलास भुमरे, कार्यकारी विश्वस्थ दादा बारे, संयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत भराड, नगराध्यक्षा विद्या भुषण कुलकर्णी (कावसानकर), नंदलाल काळे, उपनगराध्यक्ष तुषार पाटील, प्रा. संतोष तांबे, प्रा. संतोष गव्हाणे, दिनेश पारीख व धनराज चितलांगी आदींनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक ८ मार्च २०२६ पान -३


## शहरातील मोकाट कुत्र्यांचा बीड न.प.ने त्वरित बंदोबस्त करावा -सय्यद फरहान

बीड दि ७(प्रतिनिधी)- शहरातील मोकाट कुत्र्यांचे प्रमाण खूप प्रमाणात वाढलेले आहे. ही मोकाट कुत्रे लहान मुले आणि वृद्धावर हल्ला करण्याचा प्रकार घडत आहे. या मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे शहरातील व परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे तेव्हा बीड नगरपालिकेने या मोकाट कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी सय्यद फरहान यांनी केली आहे. यासंदर्भात नगरपालिकेला दिलेल्या निवेदनात नमूद केले की, शाळेत दररोज येणारे जाणारे लहान मूले यांना तर रोजच या भितीमध्ये दहशतीमध्ये जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. दरम्यान बीड शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून काही अनुचीत घटना टाळण्यासाठी बीड नगर परिषदने तातडीने कठोर उपय योजना कराव्यात व मोकाट कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी बीड नगरपालिकेला दिलेल्या निवेदनातून बीड शहर कांग्रेस सरचिटनिस सय्यद फरहान शराफत, मोमीन जकीयोद्दीन (मामु गूत्तेदार, नगर सेवक), शेख आमेर पाशा संस्थापक शेर ए हींद संघटना, साजीद लतीफ कूरेशी ओबीसी कांग्रेस बीड शहर आदींनी केली आहे.

# कर्ज फेडण्यासाठी राज्यात १९ शेतकऱ्यांनी किडनी विकल्या ?

# सरकारने कर्ज माफीच्या घोषणा करून शेतकऱ्यांना फसवल

## कर्जमाफीच्या प्रश्नावर आंदोलन छेडण्याचा भाई मोहन गुंड यांचा इशारा

केज दि ७(प्रतिनिधी)- राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना शासनाकडून पुन्हा एकदा कर्जमाफी आणि अनुदानाच्या घोषणा करण्यात येत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला .तर कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्यात तब्बल १९ शेतकऱ्यांनी



किडन्या विकल्या आहेत. कर्जमाफीच्या घोषणा हा केवळ राजकीय देखावा असल्याचा आरोप करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आंदोलन केले जाईल असा इशारा भाई मोहन गुंड यांनी दिला आहे.

यासंदर्भात सोशल मीडियावर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, कर्जमाफीसाठी किती समीती गठीत करणार आहात?, शेतकऱ्याच वजन वाटोळ करण्याचा सरकल्याने विडाच उचला असल्याचे दिसून येत आहे. आता आम्ही रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत असा इशारा देताना भाई मोहन गुंड यांनी नमूद केले की या अगोदर देखील सरकार कडून अशा प्रकारच्या घोषणा झाल्या होत्या आणि प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालाच नाही, ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे. कर्ज फेरीसाठी राज्यातील १९ शेतकऱ्यांनी आपल्या किडन्या विकल्याचे सांगण्यात येते. पूर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी त्या योजनेपासून वंचित राहिले. त्यामुळे सध्याची घोषणा देखील शेतकऱ्यांच्या नजरेत विश्वासार्ह वाटत नाही. याबद्दल शंका निर्माण होत आहे. खरं पाहिलं तर शासनाचे धोरण शेतकऱ्यांना कर्ज घेण्यास प्रवृत्त करणारे झाले आहे. ''कर्ज काढा आणि नंतर कर्जमाफीसाठी भिक मागा'' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रोज शेतकरी मृत्यूला कवठाळत आहे, शेतकरी कर्जबाजारी होऊच नयेत यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाय योजना करण्याऐवजी केवळ कर्जमाफीच्या घोषणा करून तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज जगातील अनेक देश शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ व्यवस्थापन आणि उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देत आहेत. मात्र भारतात अजूनहीशेतकऱ्यांच्या प्रश्नांचे उत्तर कर्जमाफी आणि अनुदान यामध्येच शोधले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची खरी प्रगती होत नाही, उलट त्यांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत जातात. शेतीमालाला योग्य आणि हमीभाव निश्चित करणे, उत्तम आणि परवडणारी खते व बियाणे उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांच्या मालासाठी मजबूत बाजारपेठ निर्माण करणे, शेती उत्पादन साठवणूक व प्रक्रिया उद्योग वाढवणे थेट ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचवण्याची व्यवस्था उभी करणे शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफी देण्यापेक्षा त्यांना स्वाभिमानाने शेती करता येईल अशी व्यवस्था उभी करणे हे शासनाचे खरे कर्तव्य आहे. अन्यथा कर्जमाफीच्या घोषणा या केवळ राजकीय दिखावा करू नका, सरसकट कर्ज माफी द्या, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जन आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे.

## श्री बालाजी आरती ग्रुपच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

परळी दि ७ (प्रतिनिधी) शहरातील पेठगल्ली येथील श्री बालाजी मंदीरमध्ये श्री बालाजी आरती ग्रुप च्या वतीने ६ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बालाजी मंदीर मध्ये शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अभयकुमार ठक्कर व शिवसेनेचे नवनिर्वाचित नगर सेवक तथा श्री बालाजी मंदीरचे अध्यक्ष राजा पांडे या दोघांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या



प्रतिमेस पुष्पहार घालून व प्रमुख पाहुन्यांचे हस्ते दिप प्रज्वलित करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उस्साहाने साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुने म्हणुन शिवसेनेचे वैजनाथ गल्ली प्रमुख संजय कुकडे शिवसेनेचे उपशहर प्रमुख किशन बुंदीले छावा संघटनेचे सदस्य निरज रावसाहेब देशमुख व मोहन परदेशी ह्या प्रमुख पाहुन्यांचे हस्ते दिप प्रज्वलित करण्यात आले यावेळी श्री बालाजी आरती ग्रुप च्या महीला सदस्या व पुरूष सदस्य व बाल गोपाल मंडळी व हजारों च्या संखेने जमलेले शिवभक्त यांच्या उपस्थित छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

# महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दोन तरुणी केज येथून बेपत्ता

केज दि ७ (प्रतिनिधी) -मागील काही दिवसाखाली केज तालुक्यातून अल्पवयीन दोन मुलीचे अपहरण प्रकरण घडल्याने सर्वत्र पालक वर्गात चिंता व्यक्त केली जात असतानाच पुन्हा एक प्रकार समोर आला आहे. वडीला सोबत केज येथील महाविद्यालयात फीस भरण्यासाठी आलेल्या दोन मुली गायब झाल्याने पालक वर्ग चिंतेत आहेत तर पोलीस तपासाला लागले आहेत

केज तालुक्यातील नामेवाडी येथील २२ वर्षे वयाची विद्यार्थिनी केज शहरातील जीवन शिक्षण महाविद्यालयात बी. एस्सी द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून बुधवार दि.४ मार्च रोजी सकाळी साडे आकरा वाजता आपल्या वडिलां सोबत परीक्षा फीस भरण्यासाठी महाविद्यालयात आली होती. परिक्षा फीस भरल्यानंतर दोघेही आवारातील कठड्यावर बसले होते. दरम्यान दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान वडिलांची नजर चुकवून सदर विद्यार्थिनी बेपत्ता झाली आहे. पाहूणे व नातेवाईकां कडे तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. वडिल यांच्या फिर्यादीवरून गुरूवारी केज पोलीस ठाण्यात या प्रकरणी हरवली असल्याची नोंद करण्यात आली आहे. तर दुसरी घटना काळेगाव (घाट) येथील १८ वर्षे वयाची विद्यार्थिनी भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालयात शिक्षण घेत आहे. सोमवार दि. २ मार्च रोजी दुपारी अडीच वाजण्या च्या दरम्यान ती अद्यापक विद्यालयातून कोणालाही न सांगता निघून गेली आहे. वडिल यांच्या फिर्यादी नुसार केज पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे.अवघ्या तीन दिवसात केज शहरातील २ महाविद्यालयीन वेगवेगळ्या घटनेत दोन विद्यार्थिनी बेपत्ता झाल्या असल्याने पालकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार हनुमान मुंडे व जमादार शकील शेख हे पुढील तपास करीत आहेत. दरम्यान यातील एक विद्यार्थिनी आळंदी येथून पोलिसांनी ताब्यात घेतली असल्याचे बोलले जात आहे.

## यशस्वी उद्योजक होण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची आवश्यकता-प्राचार्य डॉ.सानप

छत्रपती संभाजीनगर दि.७(प्रतिनिधी)-कोणताही उद्योग, व्यवसाय रातोरात उभा राहत नाही. यशस्वी उद्योगांच्या, व्यवसायांच्या आणि उद्योजकांच्या मागे अनेक वर्षाचे कठोर परिश्रम आणि अनुभव दडलेले असतात हे लक्षात घेऊन युवकांनी यशस्वी उद्योजक , व्यवसायीक होण्यासाठी आत्मविश्वासाने कठोर परिश्रम घेण्याची गरज आहे. संयमाची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.नामदेव सानप यांनी केले. त्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात महाराष्ट्र उद्योजक विकास केंद्र आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या तीस प्रशिक्षणार्थींचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. सानप हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर एम सी ई डी चे प्रशिक्षण समन्वयक रितेश साळवे प्रा.संतोष प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की, शासनाच्या विविध उद्योजकता विकास योजनेचा लाभ घेऊन महाराष्ट्र उद्योजक विकास केंद्र आणि बार्टी संस्थेच्या सहाय्याने युवकांनी ध्येयाने उद्योग ,व्यवसाय उभारण्याची आवश्यकता आहे .यावेळी एमसीईडीचे प्रशिक्षण समन्वयक रितेश साळवे म्हणाले की, उद्योजक प्रशिक्षणार्थींनी आपले प्रशिक्षण यशस्वी करून उद्योजक कौशल्य आत्मसात करून उद्योग व्यवसायास प्रारंभ करावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हर्षल वाघमारे यांनी केले तर शेवटी आभार प्रा. राजेंद्र भगत यांनी मानले

## वाहतूक पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पकडून केली कारवाई

बीड दि ७(प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईत बीड जिल्हा वाहतूक शाखेने मोठी कारवाई करत वाळूने भरलेला हायवा जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.याबाबत माहिती अशी की जिल्हा वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार अजीनाथ विष्णु मुंडे यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक ४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास सपोनि सानप, पोह.तांदळे व पोशि. कदम यांच्यासह अवैध धंद्यांवर कारवाईसाठी पेट्रोलिंग करत असताना मालेगाव ते उमापूर रोडवरून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर या पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा रचला. दरम्यान मालेगावकडून उमापूरकडे जाणारा भारत बेंझ कंपनीचा वाळूने भरलेला एम एच तेवीस२३ एयू ३५ ९६ या क्रमांकाचा हलवा दिसताच पोलिसांनी थांबवून ताब्यात घेतला.चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव जावेद युसुफ पठाण (रा. महारटाकळी, ता. गेवराई, जि. बीड) असे सांगितले.पोलिसांनी वाळू वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे कोणताही अधिकृत परवाना आढळून आला नाही. त्यानंतर पंचांसमक्ष वाहनाची पाहणी केली असता हायवामध्ये सुमारे ६ ब्रास वाळू आढळून आली. त्यावरून भारत बेंज कंपनीचा सुमारे २५ लाख रुपये किमतीचा हायवा तसेच तीस हजार रुपये किमतीची सहा ब्रास वाळू पोलिसांनी जप्त करून चकलंबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## खुनाच्या गुन्ह्यातील फरारी आरोपी पकडला ; ९ मार्च पर्यंत पोलीस कोठडी

केज दि ७ (प्रतिनिधी) दहा महिन्यापासून असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी पळसखेडा शिवारात जेरबंद करून गुरूवारी न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीला ५ दिवस पोलीस कोठडी सूनावली .केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील लाडेगाव शिवारात दि. २७ मे २०२५ रोजी तालुक्यातील भाटुंबा येथील दगडू उर्फ अण्णा ज्ञानेश्वर धपाटे यांच्या खून प्रकरणातील दाखल गुन्ह्यातील व अंबाजोगाई येथील रहिवासी आशिष बळीराम अंबाड हा आरोपी मागील १० महिन्यांपासून फरार होता. बुधवार दि.४ मार्च रोजी गोपनीय माहिती मिळताच आरोपी आशिष बळीराम अंबाड सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक छाया वाघमारे (कोमटवार), व पोलीस धनंजय कारले यांनी अटक पळसखेडा शिवारात ताब्यात घेतले. गुरूवार दि.५ मार्च रोजी आरोपी ला केज न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीला दि.९ मार्च पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे करीत आहेत.

## गंभीर जखमी अमोल कांबळेवर अतिदक्षता विभागात उपचार



बीड दि ७ (प्रतिनिधी)- धुरवडीच्या दिवशी बीड शहरातील बार्शी नाका परिसरात इमामपूर रोडवरील प्रकाश आंबेडकर नगर येथे पाच ते सहा जणांच्या टोळीने रिक्षाचालक अमोल कांबळे यांच्यावर लोखंडी रॉड व लाकडांनी जीवघेणा हल्ला करत बेदम मारहाण करण्याची घटना धुळवंडीच्या दिवशी सायंकाळी घडली होती. या हल्ल्यात अमोल कांबळे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, पोलिसांनी जखमीचा जबाब नोंदवून सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळी भेट देऊन रक्ताचे नमुने तपासणीसाठी जप्त केले आहेत. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून आरोपींचा शोध सुरू आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुजारी आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल रमेश भोले करत आहेत.

# आठवडा संपला तरी बी.एल.ओ.फिरकले नाहीत ; उर्वरित २५ दिवसात काय करतील ?

बीड दि ७ (प्रतिनिधी) - एस.आय.आर. अर्थातच स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन प्रक्रिया राबविण्यासाठी नियुक्त केलेले बी.एल.ओ. गायब असल्याने तसेच या प्रक्रियेसाठी देण्यात आलेल्या मुदतीतून ६ दिवस संपून आता फक्त २५ दिवसच उरल्याने ही प्रक्रिया ३१ मार्च २०२६ पर्यंत तंतोतंत कशी पूर्ण होईल? बी.एल.ओं.चा हलगर्जीपणा कामचुकारपणामुळे मतदारांचे नाव वगळण्यात आल्यास जबाबदार कोण? असे प्रश्न जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्तांना एस.एम.युसूफ़ आणि रमेशराव गंगाधरे यांनी पाठविलेल्या निवेदनातून उपस्थित केले आहेत.

याविषयी पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, भारतीय निवडणूक आयोगाकडून स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन अर्थातच एस.आय.आर. ची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याची मुदत ३१ मार्च पर्यंत देण्यात आलेली आहे. आतापर्यंत ६ दिवस म्हणजे जवळपास एक आठवडा उलटूनही ही प्रक्रिया राबविण्यासाठी नेमणूक करण्यात आलेले बी.एल.ओ. अजूनही नागरिकांपर्यंत पोहोचलेले नाहीत. नेमणूक करण्यात आलेल्या बी.एल.ओं. च्या हलगर्जीपणामुळे किंवा कामचुकारपणामुळे जर एस.आय.आर. प्रक्रियेतून मतदारांची नावे वगळण्यात आली, त्यांच्या मतदानाचा हक्क हिरावला गेला, त्यांचे राष्ट्रीयत्व संपविण्यात आले तर यास जबाबदार कोण? भारतीय निवडणूक आयोग, प्रक्रिया राबविणारे जिल्हा प्रशासन की, बी.एल.ओ.? जर ही प्रक्रिया व्यवस्थितपणे राबविण्यात आली नाही तर प्रक्रिया राबविणारे वरीलपैकी कुणाचीही गल्लत असो पण नवीन मतदार यादीतून मतदारांची नावे वगळण्यात आल्यास त्याचे दुष्परिणाम मात्र मतदारांनाच भोगावे लागतील. स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन अर्थातच एस.आय.आर. ही प्रक्रिया राबविण्यासाठी देण्यात आलेली मुदत वाढविण्यात यावी. हलगर्जीपणा/ कामचुकारपणा करणाऱ्या बी.एल.ओं. ना सक्तीने जनतेपर्यंत जाण्याचे फर्मान देऊन त्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. कोणत्या भागात कोणत्या बी.एल.ओ. ची नेमणूक करण्यात आली आहे, त्याचे नाव आणि भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक जाहीर करण्यात यावेत. अशी मागणी ही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## जि प शाळेचे लोखंडी गेट पडले ; एक विद्यार्थी जखमी

बीड दि ७ (प्रतिनिधी)- जिल्हा परिषद शाळेचे लोखंडी गेट अचानक कोसळल्याने अर्शलान बागवान हा विद्यार्थी जखमी झाला अशी घटना शहरातील बार्शी नाका परिसरात घडली. घटना घडतात जखमी विद्यार्थ्याला तातडीने बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सदर विद्यार्थी हे गेट उघडण्यासाठी धावत गेले असता अचानक शाळेचे गेट कोसळले. यामध्ये हर्षलान बागवान किरकोळ जखमी झाला असल्याचे सांगण्यात येते परंतु घटना घडल्याचे माहिती होताच पालक वर्गाने या शाळेमध्ये धाव घेतली. या घटनेमध्ये अनुचित जरी घडलं नसलं तरी या घटनेमुळे शाळेतील सुरक्षा व्यवस्थेवर मात्र गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. गेटची अवस्था जीर्ण असतानाही त्याची दुरुस्ती किंवा सुरक्षिततेची कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतण्याची वेळ आल्याची संतप्त प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे. तसेच शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेचा तातडीने आढावा घेण्याचीही गरज व्यक्त केली जात आहे.

## हभप सुरेश महाराज जाधव यांच्या काल्याच्या कीर्तनाने सासुरा येथील नाम सप्ताहाची सांगता

केज दि ७ (प्रतिनिधी) - तालुक्यातील सासुरा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची ह भ प सुरेश महाराज जाधव यांच्या काल्याच्या कीर्तनाने मोठ्या भक्ती भावात सांगता झाली.

याबाबत थोडक्यात असे की तालुक्यातील सासुरा येथे श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या स्वतःच समारोपात ६ मार्च रोजी ह.भ.प. सुरेश महाराज जाधव यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने या स्वतःची सांगता झाली . अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मठाधिपती ह.भ.प. रतन महाराज सासुरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या कार्यक्रमास विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत भैय्या मुंडे यांची विशेष उपस्थिती होती. काल्याचा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. शेवटी महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घेतला. यावेळी परिसरातील गुणवान गायक, वादक यांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## शिव जयंती निमीत्त ढेकणमोहा येथे सत्यपाल महाराज यांचे किर्तन

ढेकणमोहा दि ७ (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील ढेकूण मोहा येथे छत्रपती शिवाजी महाराजाची जयंती साजरा करण्यात येणार असून यानिमित्त शिवप्रेमीच्या उपस्थितीत ग्रामस्थाची बैठक संपन्न झाली. वास्तव सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी बैठकीमध्ये समाजोपयोगी कार्यक्रम घेण्याचे ठरले.गोरक्षनाथ टेकडीचे महंत सर्वाचे श्रद्धास्थान शांती ब्रम्ह नवनाथ बाबा यांनी परिक्रमा केल्याने बाबांचे ढेकणमोहा ग्रामस्थाच्या वतिने जल्लोषात स्वागत सोमवार दि.१६ मार्च २०२६ रोजी वेळ दूपारी ४ वा बसस्थानका पासून गावात टाळ,मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढून करण्याचे ठरले आहे.नवनाथ बाबाच्या हस्ते छत्रपत्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे.बाबांचे सर्व ढेकणमोहा ग्रामस्थांच्या वतिने स्वागत करण्यात येणार आहे.यानतंर याच दिससी ढेकणमोहा बाजारस्थळावर सायं.७:३० वा राष्ट्रीय समाज प्रबोधनकार खंजिर वादक सत्यपाल महाराज यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन होणार आहे.अतिशय समाजोपयोगी कार्यक्रम असल्याने सर्वानी सहभाग नोंदवावा.असे आव्हान ढेकणमोहा ग्रामस्थांनी केले आहे.

## श्री जवळेश्वर देवस्थानला ब वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त



जामखेड दि ७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील जवळा येथील श्री जवळेश्वर देवस्थानला ब वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. याबाबतचा शासन निर्णय प्रसिध्द झाला आहे. विधानसभेचे माजी सभापती प्रा. राम शिंदे यांनी यासाठी केलेल्या प्रयत्नाला यश आल्याने ग्रामस्थ भाविका म्हणन आनंद व्यक्त केला जात आहे

.महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ( ब - वर्ग ) अंतर्गत श्री जवळेश्वर देवस्थान या ''क'' वर्ग ग्रामीण यात्रास्थळाचा ''ब'' वर्ग दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास २८ फेब्रुवारी रोजी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीच्या बैठकीत छाननी करण्यात आली. प्रस्ताव संदर्भीय शासन निर्णयातील निकषांनुसार परिपूर्ण सादर केला असल्याने, श्री जवळेश्वर देवस्थानास ''ब वर्ग '' दर्जा देण्याबाबत शिफारस करण्यात आली होती. दरम्यान यासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी सतत पाठपुरावा करून शिफारस केली होती. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत रितसर प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यासाठी सर्व विभागाचे सविस्तर प्रशासनाला सादर झाले होते त्यास राज्य निकष समितीच्या बैठकीत मान्यता मिळाल्यानंतर ब वर्ग दर्जा देणेबाबतचा शासन निर्णय झाला आहे. दरम्यान देवस्थानासाठी ''ब'' वर्ग दर्जा मिळणे जवळा गावासाठी खूप मोठी अभिमानाची बाब आहे. या माध्यमातून श्री जवळेश्वर देवस्थान सबंधीत विविध विकास कामे होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. असे मत जवळा येथील सरपंच सुशील आव्हाड यांनी यासंदर्भात नमूद केले.

## अजित देशमुख यांच्या फौजदार पदी निवडीबद्दल माकेगावात फटाके फोडले

अंबाजोगाई दि ७ (प्रतिनिधी)- अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव येथील शेतकऱ्याचा मुलगा अजित देशमुख यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड



झाल्याबद्दल फटाके वाजवून पेढे वाटून गावकऱ्यांनी आनंद साजरा केला.नुकत्याच घेण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग या परीक्षेत अजित देशमुख यांनी हे यश मिळवले आहे.अगदी कमी वयात माकेगावातून पहिले पोलिस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळवला आहे.

अजित देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे माध्यमिक शिक्षण ममदापूर येथील संभाजीराव बडगिरे महाविद्यालय येथे तर पदवीचे शिक्षण लातूर येथे झाले. पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल अजित देशमुख यांचे अंबाजोगाई तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.त्यांच्या यशाबद्दल गावकऱ्यांनी अभिनंदन करत गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतषबाजी करत पेढे वाटून आनंद साजरा केला.

# पोलीस वेलनेस व थेरपी सेंटरचे पो.अ.काँवत यांच्या हस्ते उद्घाटन




बीड (प्रतिनिधी) – जुने एस.पी. ऑफीस समोरील संगम हॉल, बीड येथे पोलीस वेलनेस व थेरपी सेंटर तसेच योग अभ्यास, झुंबा ॲरोमिक्स व करा ओके सिंगींग एकाच छताखाली संगम हॉल बीड येथे पोलीस अधिक्षक नवनीत कावत साहेब यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेलनेस सेंटर, थेरपी, योग अभ्यास व करा ओके सिंगींग सर्व पोलीस कर्मचारी यांनी लाभघ्यावा. तसेच जेष्ठ नागरीकांनी सुध्दा याचा लाभ घ्यावा असे पोलीस अधिक्षक नवनीत कावत साहेब यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले. या उद्घाटन प्रसंगी पोलीस निरीक्षक बी. बी. गात साहेब, पी.एस.आय. राजकुमार प्रकाश, ॲड अविनाश गडगे, हेड कॉन्स्टेबल नितीन वडमारे, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल श्रीमती मनिषा वाव्हळ, महिला पोलीस ॲड कॉन्स्टेबल माया साबळे, निवृत्त पोलीस अधिकारी सय्यद अलीम, श्री. मॅथू जोसेफ, बसस्टँड इनचॉर्ज श्री. किरण बनसोडे, भास्कर वडमारे, विनोद सवई, जनार्धन वडमारे आदी पोलीस कर्मचारी व नागरीक उपस्थित होते. या पोलीस वेलनेस व थेरपी सेंटर तसेच योग अभ्यास, झुंबा ॲरोमिक्स व करा ओके सिंगींग या सर्व सुविधा सर्वसामान्यासाठी अल्पदरात उपलब्ध असून त्याची सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान पोलीस वेलनेस व थेरपी सेंटरचे संचालक राजकुमार प्रकाश यांनी केले आहे.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या महिला कक्षातर्फे स्नेह सावली येथे महिला दिन साजरा

बीड दि ७(प्रतिनिधी)– आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या महिला कक्षातर्फे रामनगर, जालना रोड, बीड येथील स्नेह सावली – स्नेहातारा वृद्धाश्रम येथे भेट देऊन समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.या प्रसंगी वृद्धाश्रमातील वृद्ध महिलांना साड्या देण्यात आल्या तसेच तेथील लहान मुलांना कपडे, फळे वाटप करण्यात आले. याशिवाय किराणा साहित्य खरेदीसाठी मदतनिधी देऊन महिला दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमामुळे तेथील रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालया तील प्रा. छाया सोंडगे, प्रा.वर्षाताई भोसले, डॉ.नीता बावणे व डॉ.दीपमाला माने यांनी पुढाकार घेतला व कार्यक्रमाचे आयोजन केले.यावेळी स्नेह सावली संस्थेअंतर्गत चालविण्या त येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. बेघर, बेसहारा, मनोरुग्ण व अनाथ बांधवांसाठी हक्काचे घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्नेह सावली प्रकल्पासह हरित वृक्ष प्रकल्प आदी सामाजिक प्रकल्पांची माहिती त्यांनी जाणून घेतली.यावेळी आपल्या मनोगतात सांगितले की, समाजातील अनाथ, अपंग, मनोरुग्ण अशा दुर्लक्षित घटकांची सेवा करण्याचे महान कार्य स्नेह सावलीचे प्रमुख श्री निलेश मोहिते व त्यांच्या सहचारिणी वैष्णवी मोहिते अत्यंत सेवाभावाने करत आहेत. त्यांच्या या कार्यामुळे समाजात एक आदर्श निर्माण झाला आहे. प्रत्येक कुटुंबाने हा आदर्श घेतला तर समाजातील अनेक समस्या कमी होण्यास मदत होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.या उपक्रमामुळे महिला दिनाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन



**दरवर्षी ८ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो या दिवशी महिलांची हक्क समानता समान सशक्तिकरण्यासाठी समर्पित आहे. आज महिला सर्व क्षेत्रात महिलांची मोठी प्रगती झालेली आहे तरीही आजही महिलांसमोर सामाजिक आर्थिक आणि मानसिक समस्या मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येत आहेत. याकडे आपल्याला लक्ष देणे आजची गरज झाली आहे. २०२६ कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळामध्ये महिला यशाचे शिखर गाठत आहे पण त्याचबरोबर त्यांच्या मानसिक आणि शारीरिक समस्या देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहेत याकडे आज लक्ष देण्याची गरज आहे. कारण महिला कुटुंब समाज आणि राष्ट्राच्या विकासाची महत्त्वाची भूमिका बजावते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. त्यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणं अत्यंत आवश्यक झालेलं आहे.**

### महिलांचे मानसिक आरोग्य:

जागतिक आरोग्य संघटना यांनी १९४८ मध्ये आरोग्याची व्याख्या करताना असे म्हणतात आरोग्य म्हणजे केवळ आजाराचा अभाव नव्हे तर संपूर्ण शारीरिक मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य होय.

महिलांचे मानसिक आरोग्य चा अभ्यास करत असताना आयुष्यात येणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवांना खंबीरपणे सामोर्य जाणे समाजातील नातेसंबंध टिकवणे व भावनिक दृष्ट्या सक्षम असणे म्हणजे मानसिक आरोग्य चांगले होय.ज्यामुळे ती जीवनातील ताण–तणावाला सामोरे जाऊन सकारात्मक आणि समाधानकारक जीवन जगू शकते.

### महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक

१) सामाजिक दबाव: घर नोकरी कुटुंब आणि मुलांच्या जबाबदाऱ्या यामुळे महिलांमध्ये ताण वाढतो.

२) लिंगभेद आणि असमानता: आज अनेक ठिकाणी महिलांना समान संधी मिळत नाही. बढतीच्या वेळेस स्त्री पुरुष असा भेद आजही केला जातो.

घरगुती हिंसा: आज ही महिला वर शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचं प्रमाण हे वाढले वाढलेलं आहे.आर्थिक समस्या: आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे असुरक्षिततेची भावना वाढलेली आहे. शारीरिक व हार्मोन्स मधील बदल: गर्भधारणा प्रसूती मासिक पाळी रोजनियवृत्ती यामुळे मानसिक स्थितीवर परिणाम होऊ लागला आहे. आज मुलीमध्ये लवकर पाळी येणे, पीसीडीओ समस्या, गर्भधारणेच्या समस्या रोजी निवृत्तीच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

सामाजिक अपेक्षा: सुपर वुमन सिंड्रोम हा मोठ्या प्रमाणात आज वाढलेला दिसून येत आहे याचे कारण कुटुंब आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करताना महिलांमध्ये दिसून येणारी ही सर्वात मोठी मानसिक विकृती आहे.

### महिलांमध्ये आढळणाऱ्या मानसिक समस्या:

**तणाव** (stress) :– तणाव म्हणजे जीवनातील विविध परिस्थितींमुळे मनावर व शरीरावर निर्माण होणारा मानसिक दबाव होय. जेव्हा हा तणाव दीर्घकाळ टिकतो आणि व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर, वर्तनावर व आरोग्यावर परिणाम करतो, तेव्हा त्याला तणाव विकृती असे म्हणतात. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये तणावाचे प्रमाण अधिक आढळते, कारण महिलांवर कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या जास्त असतात.

### महिलांमध्ये ताण विकृतीची कारणे

१) कौटुंबिक जबाबदाऱ्या : घरातील कामे, मुलांचे संगोपन, वयोवृद्धांची काळजी या जबाबदाऱ्यांमुळे महिलांवर ताण वाढतो.

२) काम आणि कुटुंबातील संतुलन : नोकरी करणाऱ्या महिलांना घर आणि काम यामध्ये संतुलन राखणे कठीण जाते.३) सामाजिक अपेक्षा : समाजात महिलांकडून अनेक अपेक्षा ठेवण्यात येतात. त्या पूर्ण करण्याच्या प्रयत्नात मानसिक ताण वाढतो. ४) आर्थिक समस्या : आर्थिक असुरक्षितता किंवा आर्थिक स्वावलंबन नसणे यामुळे महिलांमध्ये तणाव निर्माण होतो. ५) कौटुंबिक हिंसा : घरगुती हिंसा, मानसिक छळ किंवा अपमान यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.

### तणाव विकृतीची लक्षणे

सतत चिंता किंवा अस्वस्थता, चिडचिड किंवा राग वाढणे, झोप न लागणे, थकवा आणि कमजोरी, डोकेदुखी किंवा शरीरदुखी, एकाग्रता कमी होणे, आत्मविश्वास कमी होणे

### तणाव विकृती कमी करण्याचे उपाय

१) योग आणि ध्यान : योग, प्राणायाम आणि ध्यान यामुळे मानसिक शांतता मिळते.२) वेळेचे योग्य नियोजन : दैनंदिन कामांचे योग्य नियोजन केल्यास तणाव कमी होतो.३) कुटुंबाचा आधार : कुटुंबातील सदस्यांनी महिलांना भावनिक आधार देणे आवश्यक आहे.४) स्वतःसाठी वेळ काढणे : छंद जोपासणे, वाचन, संगीत ऐकणे यामुळे मन प्रसन्न राहते.

५) समुपदेशन आणि उपचार : तणाव जास्त असल्यास मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे.

**महिलांमधील चिंता विकृती** (Anxiety Disorder in Women) : चिंता ही मानवी जीवनातील सामान्य भावना आहे. परंतु जेव्हा चिंता खूप जास्त प्रमाणात, दीर्घकाळ आणि कोणत्याही ठोस कारणाशिवाय जाणवते आणि दैनंदिन जीवनावर परिणाम करते, तेव्हा तिला चिंता विकृती असे म्हणतात. महिलांमध्ये सामाजिक, कौटुंबिक आणि भावनिक कारणांमुळे चिंता विकृतीचे प्रमाण तुलनेने अधिक आढळते.

चिंता विकृती म्हणजे अशी मानसिक अवस्था ज्यामध्ये व्यक्तीला सतत भीती, काळजी, असुरक्षितता आणि अस्वस्थता वाटते. ही भावना इतकी तीव्र होते की ती व्यक्तीच्या दैनंदिन कामकाजावर आणि सामाजिक जीवनावर परिणाम करते.चिंता विकृतीचे परिणाम : चिंता विकृतीकडे दुर्लक्ष केल्यास तिचे मानसिक आणि शारीरिक परिणाम होऊ शकतात.

### चिंता विकृतीचे प्रकार

सामान्यीकृत चिंता विकार (Generalized -nxiety Disorder), भीती विकार (Phobia), घाबराट विकार (Panic Disorder), सामाजिक चिंता विकार (Social -nxiety Disorder)

महिलांमधील चिंता विकृती ही आजच्या काळातील गंभीर मानसिक आरोग्य समस्या आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि आर्थिक अडचणी यामुळे महिलांमध्ये चिंता वाढते. त्यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना भावनिक आधार देणे आणि योग्य उपचार उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

**नैराश्य** (Depression) :– आत्मविश्वास कमी होणे, शारीरिक थकवा, कामकाजावर परिणाम, सामाजिक संबंधांमध्ये अडथळे नैराश्य (Depression) हा एक गंभीर मानसिक विकार आहे. यात व्यक्ती दीर्घकाळ दुःख, निराशा, उदासी आणि उत्साहाचा अभाव अनुभवते. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये नैराश्याचे प्रमाण अधिक आढळते. कारण महिलांवर कौटुंबिक, सामाजिक आणि भावनिक जबाबदाऱ्यांचा ताण जास्त असतो.मानसिक आरोग्याविषयी काम करणाऱ्या World Health Organization च्या अहवालानुसार महिलांमध्ये नैराश्य विकृतीचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक दिसून येते.महिलांमध्ये नैराश्य विकृती म्हणजे अशी मानसिक अवस्था ज्यामध्ये स्त्री सतत दुःखी, निराश आणि थकलेली वाटते. तिला कोणत्याही गोष्टीत आनंद वाटत नाही आणि तिच्या दैनंदिन जीवनावर व सामाजिक संबंधांवर परिणाम होतो.

**नैराश्याचे परिणाम :**महिलांमधील नैराश्याचा परिणाम त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनावर होऊ शकतो. कामकाजा वर परिणाम, कुटुंबातील संबंध बिघडणे, शारीरिक आरोग्य समस्या, आत्मविश्वास कमी होणे.



**प्रा.डॉ.सुनिता वाटोरे**
मानसशास्त्र विभाग कला महाविद्यालय,नांदुरघाट

# पोलीस पाटील भरती प्रक्रिया पारदर्शक वशिल्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

## उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांचे उमेदवारांना आवाहन

अंबाजोगाई दि ७(प्रतिनिधी) –अंबाजोगाई उपविभागातील ग्रामीण भागातील पोलीस पाटील पदाच्या भरतीसाठी घेतली जाणारी लेखी व तोंडी परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे पार पडत असून संपूर्ण प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार राबविण्यात येत आहे. उमेदवारांना कोणत्याही प्रकारची तक्रार राहू नये यासाठी प्रशासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.उपजिल्हाधिकारी वजाळे यांनी सांगितले की, पोलीस पाटील पदासाठीची भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत आहे. लेखी परीक्षा, कागदपत्रांची तपासणी तसेच तोंडी मुलाखत या सर्व टप्प्यांमध्ये शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन केले जात आहे. परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.तसेच उमेदवारांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संपूर्ण प्रक्रियेवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून सर्व उमेदवारांना समान संधी मिळेल याची हमी प्रशासनाकडून दिली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी अधिकाऱ्यांनी उमेदवारांना आवाहन करताना सांगितले की, कोणीही 'हे अधिकारी माझ्या ओळखीचे आहेत, तुमचा वशिला



लावून देतो' अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नका. शांततेत व प्रामाणिकपणे परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन करण्यात आले.यावेळी बीडीओ कैलास बळवंत, एपीआय संदीप मांजरमे (केज), तहसीलदार विलास तरंगे, तसेच समृद्धी सुरेश भवरे (गृहपाल, मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबाजोगाई) आदी उपस्थित होते. पोलीस पाटील भरतीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पूर्ण केली जाईल, असा विश्वास उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांनी व्यक्त केला.

# सिद्धार्थ वाघमारे याची विकसित भारतयुथ पार्लमेंटसाठी निवड



बीड दि ७ (प्रतिनिधी)– भारत सरकारच्या 'विकसित भारत २०२६' या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी श्री बंकटस्वामी महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय 'युथ पार्लमेंट' (युवा संसद) स्पर्धेत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य् महाविद्यालयातील सिध्दार्थ श्रीकिसन वाघमारे यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली आहे.युवा पिढीला संसदेची कार्यप्रणाली कळावी आणि देशाच्या धोरण निर्मितीत तरुणांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'विकसित भारताचा रोडमॅप', 'तंत्रज्ञान आणि युवाशक्ती', आणि 'शाश्वत विकास' यांसारख्या विषयांवर आपले परखड विचार मांडले. सदर निवड प्रक्रिया ही वक्तृत्व, गटचर्चा आणि विषयाचे सखोल ज्ञान या निकषांवर आधारित होती. यामध्ये महाविद्यालयातील सिध्दार्थ वाघमारे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. निवड झालेले विद्यार्थी आता पुढील राज्यस्तरावर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर , संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपा क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, डॉ. खान ए.एस., डॉ. नारायण काकडे, प्रा. जालिंदर कोळेकर, डॉ. पद्माकर ससाणे, डॉ. सतिष माऊलगे, डॉ. सय्यद इमाद, डॉ. पल्लवी इलापल्ले, डॉ. श्रीमंत तोंडे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. आमच्या विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे, अशा शब्दांत प्राचार्यांनी गौरव केला.या यशासाठी त्यांना विभाग प्रमुख तथा कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव घोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न

माजलगाव दि ७ (प्रतिनिधी)– ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे आय ई डी एस एस ए अंतर्गत आंतर विभागीय पातळीवर २ व ३ मार्च रोजी मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा, पत्रकार उमेश जेथलीया, पत्रकार सुदर्शन स्वामी, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, व क्रीडा शिक्षक सुलतान सर यांच्या उपस्थितीत खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट संघभावना, शिस्त आणि क्रीडाभावना दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली. व्हॉलीबॉल व बास्केटबॉल या दोन्ही स्पर्धांमध्ये चुरशीचे सामने रंगले.होळी व धुलिवंदन सणांच्या पार्श्वभूमीवर



स्पर्धा पार पडत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे स्पर्धा शांततेत आणि सुरळीत वातावरणात यशस्वीरीत्या पार पडल्या.संस्थेचे प्राचार्य यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करून सर्व सहभागी खेळाडू, क्रीडा शिक्षक व आयोजन समितीचे कौतुक केले. अशा प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि क्रीडाभावना वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# स्वा.सावरकर माध्यमिक विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिरात ५४५ विद्यार्थ्यांची तपासणी

बीड दि ७ (प्रतिनिधी) – शहरातील स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आयोजित केलेल्या भव्य 'विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिरात इयत्ता ५ वी ते ९ वी मधील एकूण ५४५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी आपली सेवा दिली. यामध्ये सर्वसाधारण तपासणी डॉ. पी.के. कुलकर्णी (एम.डी. मेडिसिन) नेत्ररोग तपासणी डॉ. चंद्रकांत वाघ आणि डॉ. शरद तेलप, दंत चिकित्सा डॉ. तेजस्विनी शिंदे,




त्वचाविकार तपासणी डॉ. सुषमा देवगुडे यांनी केली. तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या दृष्टीदोषापासून ते दातांच्या आरोग्यापर्यंत सर्व बाबींची बारकाईने पाहणी करण्यात आली व आवश्यक ते वैद्यकीय सल्ले देण्यात आले.या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप आणि स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक तथा मुख्याध्यापक चंद्रकांत मुळे यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी वेळ दिल्याबद्दल सर्व डॉक्टरांचे आभार मानले .या शिबिराच्या यशस्वी नियोजनासाठी उमेश जगताप आणि डॉ. राजेश भुसारी, सौ.रत्नमाला सोनवणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि डॉक्टरांचा परिचय सौ. सुजाता चिंचपूरकर यांनी करून दिला.

# वधु वर परिचय मेळाव्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरज –प्रा.सुशीलाताई मोराळे

बीड दि.७(प्रतिनिधी)–बदलत्या काळा नुसारआधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वधुवर मेळाव्यासाठी करण्यात यावा व त्याचा लाभ राज्यातील जास्तीत वधू–वर व त्यांच्या पालकां ना देण्यात यावा. युवकांनी रोजगार भिमुख कोर्स करून छोट्या छोट्या व्यवसाय व उद्योगाच्या क्षेत्रात उतरावे असे आवाहन याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सुशीलाताई मोराळे यांनी केले.



अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु–वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु–वर,वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु–वर परिचय मेळावा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंताचा राज्यस्तरीय मातृभूमी रत्न पुरस्कार गौरव सोहळा याचे उद्घाटन करताना त्या बोलत होत्या. श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक, ॲड.जयंत राख, प्रा.आर.टी. गर्जे, डॉ. वसंत मुंडे प्रा. ज्ञानेश्वर वाघ, ऊसतोड कामगार ज्येष्ठनेते गहिनीनाथ दादा थोरे पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, मंडळ अधिकारी शितल चाटे ,मोहनराव शिरसाट, उत्तमराव मिसाळ आदींची उपस्थिती होती. छत्रपती संभाजीनगर येथून प्रकाशित होणारे प्रा. ज्ञानेश्वर वाघ संपादित वंजारी समाज महाराष्ट्र सातव्या वार्षिक अंकाचे तसेच उस्मानाबाद शेळी मेंढी जनक डॉ.वसंतराव मुंडे गौरव विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी केलेले गुणवंत डॉ. राजेंद्र सानप, अविनाश सानप, डी.जी.वानखेडे, माऊली शिरसाट, मोहन आघाव, दादासाहेब सादोळकर, रामधन जमाले, श्रीमती पद्मिनी हंगे, योगिता घुले, सीना शिरसाट, शीतल चाटे, गायक दुताडमल,केशव बडे, खेडकर आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र शाल व पुष्पगुच्छ सत्कार करण्यात आले. गुणवंत व वधु वर मेळाव्यात बोलताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे म्हणाल्या की,यावेळी मान्यवरांनी देखील आपापले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तांदळे तर सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब नागरगोजे तर आभार गणेश सानप यांनी मानले कार्यक्रमाचे नियोजन डॉ.संजय तांदळे, प्रा.ज्ञानेश्वर वाघ, इंजि.उत्तमराव मिसाळ, बाबा जायभाये, पांडुरंग जायभाये, मोहनराव सिरसाट, गणेश सानप, रवींद्र मुंडे, आत्माराम वाव्हळ, हिरामण तांदळे, डॉ.लक्ष्मण पवळ, आदींनी केले कार्यक्रमास राज्यातून वधू–वर व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.



# ८ मार्च जागतिक महिला दिन

## आंतराष्ट्रीय महिला दिन स्त्री मुक्ती नव्हे, स्त्री सन्मान..!

आयुष्यातील आणि समाजातील प्रत्येक भुमिकेत परिपुर्ण असणाऱ्या स्त्रियांना सलाम आज महिलांच्या कर्तुत्वाचा, त्यागाचा आणि योगदानाचा सन्मान करणारा दिवस जगभरात ८ मार्च रोजी आंतराष्ट्रीय महिला दिवस म्हणुन साजरा केला जातो. या दिवशी महिलांच्या हक्काबद्दल जागरुकता वाढवली जाते.

समाज, राजकारण, अर्थकारण, कौटुंबीक, शिक्षण व्यवसाय विज्ञान, संस्कृती अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांच्या महत्वपुर्ण योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. महिलांनी केलेल्या कामगिरीचा सन्मान करण्या सोबतच समाजात समान हक्क आणि संधी यांची गरज आधोरेखीत करण्यासाठीही हा दिवस महत्वाचा मानला जातो. सोप्या शब्दांत सांगायाचे झाले तर महिलांचा आदर सन्मान आणि त्यांच्या शक्तीचा उत्सव म्हणजे महिला दिन..पण जिच्या असन्याने घर सौदंर्य फुलते तिच्या सन्मान करण्यासाठी फक्त एकच दिवस का ? फक्त एका दिववापुरती नव्हे तर ती, नेहमीच खास आहे. केवळ तिच्या आस्तित्वामुळे हे जग सुंदर आहे. कसं असतं गं तुला फक्त देवुन सुखावण, एकाच आयुष्यात आई, बहिन, मुलगी, मैत्रिण, पत्नी, वहिनी, मावशी, आजी, सुन... अशी अनेक पात्र निभावण. अगं पण दिवस कोणताही असो तुला सशक्त व्हावं लागेल उठ...

सतर्क हो, सक्षम हो, समृध्द हो, समर्पक हो, अंग पण सखी या वर्षीचा महिला दिन काही खास आहे. आपण यावर्षी देन थिम राबवणार आहोत. एक म्हणजे Rights, Justice आणि Action म्हणजे अधिकार, न्याय आणि कृति, या थिमचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांसमोर असलेल्या समाजिक आणि रचनांत्मक अडथळ्यांना दुर करण्यासाठी प्रत्यक्ष कृतिची गरज अधोरेखीत करणे हा आहे. प्रत्येक मुलीला समान हक्क, न्याय आणि संधी मिळावी यासाठी समाज संध्या आणि सरकारनं पावल उचलावीत असा हेतु आहे.

दुसरी मोहिम म्हणजे Give To Gain म्हणजे मिळवणे आणि देणे.

या मोहिमेचा अर्थ... उद्देश असा आहे की, महिलांना संधी पाठिंबा आणि साधन सामग्री दिली तर त्यांचा फायदा केवळ महिलांनाच नाही तर सामाजालाही होतो. कोणत्याही क्षेत्रात महिलांना प्रोत्साहन मिळाले तर संपुर्ण समुदाय आस्त सक्षम बनतो.

Give To Gain म्हणजे देन हे कमी होणं नाही तर वाढीची सुरुवात आहे. जेव्हा सोसायटी महिलांच्या प्रगतीसाठी वेळ, ज्ञान, संसाधन, आणि संधी देतो तेव्हा समाज तिकडे वाटचाल जास्त वेगाने होते असे लक्षात येते. म्हणुनच महिला दिन हा फक्त शुभेच्छा देण्याचा दिवस नाही तर महिलांच्या सशक्तीकरणासाठी कृती करण्याची आठवण सुध्दा आहे.

समाजात कमजोरपणाचे लक्षण म्हणुन किती सहज म्हणलं जातं ना जमत नसेल तर, बांगड्या भर हातात बांगड्या हे हात तेच आहेत ज्यांनी शिवरायांसारखे सुपुत्र घडविले, ज्या जिजाऊ होत्या, ज्यांनी आपल्या पतीचे प्राण यमाकडुन परत आणले ती सत्यवानाची सावित्री होती. त्याच्यांमुळे समाजाची नविन पिठी घडविली जाते.. त्या सावित्रीबाई फुले होत्या. ज्यान प्रेम, ममता, करणा आणि सहनशिलता सामावली आहे. प्रसंगी त्यास, समर्पण, संरक्षण, कर्तुत्व, जबाबदारी आणि धाडस सुध्दा असते. संस्कृती, सन्मान, मर्यादा, सौंदर्य यांचे प्रतीक आहेत. जुन्या पिठ्यांच्या वारसा नविन पिठीला देणारे देखील हेच हात आहेत. स्वार्थ मागे ठेवुन कुटुंबाच्या सुखासाठी देवापुढे पदर परसनणारे हेच हात आहेत. त्यामुळेच इथुन पुढे हे वाक्य वापरतांना प्रत्येक व्यक्तीने विचार करणे गरजेचे आहे.

आपण प्रत्येक सण समारंभात आपण देवीची पुजा करतो, परंतु घरात साडेतीन शक्तीपीठ आहेत. बहीन, बायको, आई आणि अर्धे शक्तीपीठ मुलगी यांना जपा त्यांच्या सन्मान आणि आदर करा. सुरुवात स्वतः पासुन आपल्या कुटुंबापासुन करा आणि तीच सुरुवात नसेल तर सर्व काही व्यर्थच एकच दिवस न करता कायम तिचे रक्षण करा, आदर करा, सन्मान करा, स्वावलंबी आणि सक्षम तसेच सुशिक्षीत करा.खऱ्या अर्थाने प्रत्येक स्त्री साठी, महिला दिनाच्या शुभेच्छा असतील..!

**– श्रीमती पवार मनिषा सोपानराव**

# माजलगावात ओम शांती राजयोग तीन दिवसीय शिबिर उत्साहात संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) : महिलांना वैक्तिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात उंची गाठायची असेल तर आपले आरोग्य जपले पाहिजे. स्वतः साठी वेळ काढावा लागेल.या साठी आरोग्यम योगा क्लासेस माजलगाव सतत कार्यरत व प्रमाणिक प्रयत्न करत आहे.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रत्येक वर्षी महिला करिता अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. या वर्षी देखील माजलगाव येथे ओम शांती राजयोग या तीन दिवसीय शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरासाठी विशेष मार्गदर्शन ब्रम्हकुमारी अनु दीदी व शीला दीदी यांनी केले. या मध्ये राजयोग ध्यानाचे महत्त्व, सकारात्मक विचार, मनःशांती व अशा अनेक गोष्टीचा संदेश दिला. यामुळे उपस्थित महिलांमध्ये आपल्या आयुष्याकडे पाहण्याची एक नवीन उमेद व प्रेरणा मिळाली.



विशेष उपस्थिती डॉ. काकानी मॅडम, डॉ. प्रीती रुद्रवार, प्रा. संगीता जाधव, न्यू. व्हिजन स्कूलच्या संचालिका मनीषाताई नाईकनवरे, बीजेपीच्या नेत्या पूजाताई मुंडकर यांची उपस्थिती होती. क्लासेस च्या योग प्रशिक्षका सौ. गीता गायके यांनी अगदी काही महिला सोबत सुरू केलेला हा प्रवास आज फक्त योगा वर्ग न राहता ६८० पेक्षा जास्त मैत्रिणी ची हक्काची, आनंदाची जागा बनली आहे. इथे प्रत्येक क्षेत्रातील महिला व अनेक गृहिणी येतात योग अभ्यासामुळे त्याच्या आयुष्यात झालेले सकारात्मक बदल याची अनुभूती येथील प्रत्येक मैत्रिणी ला आली आहे. दिवसभरातील धावपळी मध्ये स्वतः साठी व स्वतःच्या आरोग्यसाठी थोडा वेळ देणे खूप महत्वाचे आहे हे आज प्रत्येक महिलेला उमजले आहे. आज शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देत सर्व सख्या अगदी आनंदाने सोबत येतात, एकमेकांना त्याच्या कामा बद्दल कौतुकाची थाप देतात, त्यांच्या आनंदात सहभागी होतात, वाढदिवस व सण उत्सव साजरे करतात. तसेच एकमेकींना सोबत घेऊन साथ देऊन पुढे जात आहेत. हीच तर खरी महिला सक्षमीकरणाची सुरवात आहे. या कार्यक्रमांमध्ये विशेष सहकार्य आरोग्य क्लासेसच्या मेंबर सारीका बेद्रे, वंदना ढालमारे, संगीता गांडगे, मंगल काठोळे, त्रिवेणी ताकट, छाया अबुज, सुजाता भोपळे, पुनम शहाणे, प्रिया मालानी, मीनाक्षी मुळे, सुवर्णा मुळे, अर्पिता खरात, पूनम अंधारे, संध्या उनवणे, विमल गंडे, अनिता शिंदे, श्रीमती घंटाजी मॅडम, अनिता गांडगे, कालींदा नायबळ, शारदा यादव, तनुजा उंचे यांनी पुढाकार घेतला.

# महाविस्तार एआय अॅप शेतकऱ्यांच्या जीवनात डिजिटल क्रांती करणार – जॉन्सन



बीड दि ७(प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कृषी विभाग बीडच्या स्टॉलला भेट देताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रतिपादन केले व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाविस्तार डाउनलोड करण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान तहसीलदार चंद्रकांत शेळके उपस्थित होते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्या स्टॉलमध्ये शेतकऱ्यांनी भेट देत महाविस्तार या अॅप डाऊनलोड करून दिले कृषी तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी महाविस्तार एआय हे शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत आहे याचीच प्रसिद्धी करण्यासाठी कृषी विभागाने आपल्या स्टॉलमध्ये भेट देणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांना महाविस्तार या अॅप डाऊनलोड करून दिले कृषी अधिकारी दत्त गणेश माळी उप कृषी अधिकारी प्रशांत नाळपे यांनी सांगितली महाविस्तार या अॅपमध्ये हवामान जमीन बाजार भाव व चॅट बोट सारखे उपयुक्त ऑप्शन आहेत याचा वापर करून शेतकऱ्यांनी उत्पादनात वाढ करावी असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडे व पोकळ घोषणा, प्रत्यक्षात राज्याची वाटचाल दिवाळखोरीकडे – श्रीनिवास बेदरे



गेवराई दि.७ (प्रतिनिधी) : राज्य सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा नसून केवळ मुंबई आणि एमएमआरडीए क्षेत्रापुरताच मर्यादित आहे. ग्रामीण भाग, शेतकरी, सिंचन, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या विषयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे असे मत बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड.श्रीनिवास बेदरे यांनी व्यक्त केले आहे. अँड.श्रीनिवास बेदरे म्हणाले की राज्याचा हा अर्थसंकल्प नसून उद्योगपती आणि कंत्राटदारांच्या भल्यासाठी मांडलेला एमएमआरडीए चा अर्थसंकल्प आहे. सरकार महाराष्ट्राला कर्जाच्या खाईत लोटत आहे आणि शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफीची कोणतीही घोषणा यामध्ये नाही. महायुतीने निव्वळ आकड्यांचा खेळ केला असून यात फक्त कंत्राटदारांचा विचार केला गेला आहे. बाकी राज्यातील शेतकरी, तरुणाई, छोटे व्यापारी आणि मध्यमवर्गाने फक्त २०४७ पर्यंत वाट पाहायची आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे काँट्रॅक्टर पास आणि सामान्य जनता नापास असे मत बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड.श्रीनिवास बेदरे यांनी व्यक्त केले आहे.

### शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वाटचाल करणे काळाची गरज – डॉ.इन्द्र मणी

गेवराई दि.७ (प्रतिनिधी) : शेतीमध्ये रासायनिक कीटकनाशक, बुरशीनाशक आणि तणनाशकाचा वापर कमी करुन जास्तीत जास्त जैविक निविष्ठांचा वापर करावा जेणेकरुन शेतकऱ्यांचा उत्पन्नावरील खर्च कमी होऊन उत्पादनात अधिक वाढ होईल व जमिनीचे आरोग्य देखील अबाधित राहते त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वाटचाल करणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन वनामकृवि, परभणीचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणी यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी आणि कृषी विज्ञान खामगाव बीड यांच्या वतीने ६ मार्च रोजी ८८ वा शेतकरी शास्त्रज्ञ ऑनलाईन सुसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी वनामकृवि, परभणीचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणी तर प्रमुख म्हणून संचालक डॉ.राकेश अहिरे, बीड जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.डॉ. एलिजा प्रधान, प्रा.अरुण गुट्टे हे होते.

# कुसळंबमधून छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानला प्रारंभ

पाटोदा (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान' अंतर्गत पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे शनिवारी (दि. ७ मार्च) महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक आर डी सी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख आणि तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे नियोजन करण्यात आले. पुढील तीन महिन्यांत या अभियानाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना विविध शासकीय सेवांचा थेट लाभ मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. शिबिरात सं. गां. यो. लाभार्थ्यांना पात्र आदेश, आरसीएमएस प्रणालीवरील ऑनलाइन रेशन कार्ड वाटप, तसेच पात्र नागरिकांना जातीचे, नॉन-क्रिमिलेअर, उत्पन्न, राष्ट्रीयत्व व अधिवास, रहिवासी, अल्पभूधारक, शेतकरी दाखले यांचे वितरण करण्यात आले.



यावेळी नायब तहसीलदार अभयकुमार जोशी, नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, तालुका सहनिबंधक पी. डी. पाटील, माऊली जरांगे, काकासाहेब लांबरुड, किरण शिंदे (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा), बाबासाहेब घुले (सरपंच, सौताडा), दिलीप भराटे (सरपंच, सुप्पा), हरिश्चंद्र येवले (सरपंच, येवलवाडी), भाऊसाहेब गाडे (सरपंच, अंतापूर), गोवर्धन सुळे (सरपंच, निवडूंगा), बाबुराव सोंडगे (सरपंच, गवळवाडी), दादासाहेब पवार (उपसरपंच, पिंपळवंडी), महादेव पवार (सरपंच, कुसळंब), उमाकांत चौधरी, अशोक पवार, एस. एम. सानप (मंडळ अधिकारी), अभिजित देशमुख (ग्राम महसूल अधिकारी, कुसळंब) यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, हे अभियान दि. २८ फेब्रुवारी ते १५ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार असून पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी लक्ष्मण नजान यांनी उपस्थित नागरिकांचे आभार मानले.

# दिंद्रुड येथे श्री संत तुकाराम महाराज बीज साजर

दिंद्रुड दि.७ (प्रतिनिधी)- माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे काशिद परिवाराच्या वतीने जगद्गुरु श्री संत तुकाराम बीज साजरी करण्यात आली. या बीज निमित्त महाराज सुशेन महाराज काशीद यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत हरिकीर्तन संपन्न झाले.

वारकरी सनकादिकाकडे संत तुकाराम महाराजांनी देवाला दिलेला निरोप आणि त्यांच्या कार्याची महती काशिद महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून सुंदररित्या सांगितली. बरोबर दुपारचे १२ वाजता भाविक-भक्तांनी तुकाराम महाराजांच्या प्रतिमेवर पुष्प वर्षाव करून त्यांचा गुणगौरव करत मोठ्या श्रद्धेने अभिवादन केले. प्रताप काशिद यांनी सुशेन महाराजांचे गंध,बुका,पुष्पहाराने स्वागत केले. तर नामदेव उद्धवराव काशीद यांनी आरती केली. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांना आरती करून वंदन करण्यात आले.आरती प्रसंगी महिला भाविकासह सर्व भाविक-भक्त टाळ्यांच्या वाद्यात देव, संतांच्या नामाचा जयघोष करत होते.

गेल्या २५ ते ३० वर्षापासून भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या सहकार्याने काशिद परिवाराने तुकाराम महाराज बीज अर्थात तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन सोहळा अखंड सुरू ठेवलेला आहे. हा सोहळा विठ्ठल -रखुमाई मंदिरात कीर्तन सोहळा संपन्न झाला. तर खोलेश्वर मंदिर सभागृहात महाप्रसाद झाला. डॉ.उमेश नारायणराव काशिद,प्रताप उर्फ बबलू काशीद, श्याम काशिद,नागेश बाजीराव काशीद या युवकांनी आलेल्या भाविक भक्तांचे स्वागत केले. खोलेश्वर तरुण मित्र मंडळाने कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ९६/२०२६ देविदास विरुध्द आशाबाई व ईतर मार्फत :श्री.आर.जी. औटे

ज्यापेक्षा **बाबासाहेब पि.मारुती ठोंबरे,** हे दिनांक ०८/०८/२०२३ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

**अर्जदार : देविदास पि. बाबासाहेब ठोंबरे,** वय ५५ वर्षे, धंदा शेती

**गैरअर्जदार : १) आशाबाई भ्र. अन्ना येवले,** वय ४९ वर्षे, धंदा घरकाम,

**२) शोभा भ्र. राजेंद्र कोल्हे** वय ४७ वर्षे, धंदा घरकाम

**अर्जदार यांचा पत्ता :** रा. शिखरवाडी तहत पारनेर, ता. पाटोदा जि. बीड

गैरअर्जदार क्र १ यांचा पत्ता : रा.म्हस्केवस्ती, डोंगरकिन्ही, ता.पाटोदा जि. बीड. गैरअर्जदार क्र २ यांचा पत्ता : रा.कोल्हेवाडी तहत साकत, ता.जामखेड जि. अ.नगर

ज्याअर्थी, अर्जदार हा मयताचा मुलगा असुन गैरअर्जदार क्र १ व २ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत **बाबासाहेब पि. मारुती ठोंबरे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक:०६/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पु.ता.२७/०४/२०२६**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक

# छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द डॉ.जगदीश टेकाळे मानसोपचार तज्ञ आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

बीड (प्रतिनिधी) : आपल्या बीड शहरामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ.जगदीश टेकाळे हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी खालील आजाराचे निदान करण्यासाठी उपलब्ध रहात आहेत. १) डोकेदुखी/अती चिंता व काळजी (सतत टेन्शन,घाबरटपणा, घाम सुटणे,थरकाम सुटणे,हाता पायांना मुंग्या येणे) २) नैराश्य/उदासिनता (मनात सतत एक सारके विचार येत राहणे, सतत शंका व्यक्त करणे,अंधारात स्वतःला कोंडून घेणे) ३) झोपेच्या समस्या (झोप न येणे, झोपेत चालणे,बडबड करणे,चक्कर येणे, दातखिळी बसणे) ४) व्यसनाधिनता (दारु,तंबाखू,गुटखा,मोबाईल गेम,गांजा,चरस,भांग व इत्यादी तत्सम प्रकारच्या व्यसनापासुन मुक्ती) ५) बालकांच्या समस्या (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा,चिडचिड पणा,अभ्यासात कमी,अति चंचलता, मतिमंदता, वागणुकीतील बदल,शैक्षणिक समस्या) ६) स्मृती भंग (विसरभोळेपणा) ७) लैंगिक समस्या (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्न दोष,कमी ताठरता,) ८) स्क्रिझेफ्रेनिया व इतर मानसिक समस्या ९) मानसिक आजार

१०) विसर पडण्याचा आजार ११) मानसिक आजारावरील उपचार (संशय घेणे,भुतबाधा,भास होणे,करणी,वेडेपणा इत्यादी) १२) उदासिनता (घबराहट,भिती,आत्महत्येचे विचार,ऐकटेपणा,व्यक्तिमत्व आजार,डोके दुखी व बऱ्याच दिवसापासून होणारी अंगदुखी,सतत चक्कर येणे,एकच विचार,एकच कृती वारंवार करणे. १३) म्हतारपणातील आजार (स्मृतीभ्रंष, निद्रानाष,



वेडेपणा,ऐकाकीपणा) १४) समुपदेशन (वैवाहिक व कौटुंबिक कलह, करिअर,अभ्यास,प्रेमभंग इत्यादी) १५) समुपदेशन/कौन्सेलिंग/थेरपी १६) ताणतणाव नियोजन १७) राग/संताप नियोजन १८) अभ्यास मार्गदर्शन १९) मनोलैंगिक समस्या : लैंगिक कमजोरी, शीघ्रपतन, स्वप्नदोष,लैंगिक समाधान, इच्छेचा अभाव, २०) नैराश्य, उदासपणा, मानसिक ताणतणाव, आत्महत्तेचे विचार २१) मनात एकच विचार/शका वारंवार येणे, वारंवार एकच कृती करणे २२) वयसकर माणसांच्या विसरण्याची सवय २३) सर्व तपासण्या/ रिपोर्ट नॉर्मल असूनही सतत शारिरिक त्रास होणे. २४) आपल्याला काहीतरी गंभीर आजार असेल किंवा होईल याची भिती वाटणे. २५) झोपेच्या समस्या, सतत चिंता काळजी, जुनाट डोकेदुखी, दातखिळी बसणे. २६) असंबंध बडबड, भिती संशय, भास होणे. २७) लहान मुलांच्या समस्या : अभ्यासात लक्ष नसणे, हट्टीपणा, अतिचंचलता, झोपेत लघवी होणे, मतिमंद मुलांच्या वर्तणुकीच्या समस्या. २८) व्यसनांच्या समस्या : दारु, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मावा, इ. २९) व्यसनमुक्ती/ नशामुक्ती वरील उपचार साठी डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

दै.पार्श्वभूमी,बीड Date-08/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - NASIM BEGAM HAYYU SHAIKH**

**New Name : NASEEM HAYYU SHAIKH**

ADDRESS- AT MOGRA, POST ANANDGAON TQ.MAJALGAON, DIST. BEED. MH - 431131
MOB.:+919011993373

दै.पार्श्वभूमी,बीड Date-08/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAMIMBI AMBIR SHAIKH**

**New Name : SHAMIMBI AMIR ATTAR**

ADDRESS- NEAR MADINA MASJID, ASHOK NAGAR, MANJLEGAON PO: MAJALGAON, DIST: BEED, MAHARASHTRA - 431131
MOB.: +919657732755

दै.पार्श्वभूमी,बीड Date-08/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - AMBIR SHAIKH**

**New Name : AMIR SAJJAN ATTAR**

ADDRESS- NEAR MADINA MASJID, ASHOK NAGAR, MANJLEGAON PO: MAJALGAON, DIST: BEED, MAHARASHTRA - 431131
MOB.: +919657732755

दै.पार्श्वभूमी,बीड Date-08/03/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAIKH SARTAJ SHAIKH HAMID**

**New Name : SARTAJ SHAIKH HAMEED SHAIKH**

Address- Radha Takij Jawal Bilal Mohalla, Majalgaon Dist Beed - Maharashtra 431131

# पार्श्वभूमी

दि.०८ मार्च २०२६ रविवार





## शिफा आतार हिचा पहिला रोजा संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) :- तालुक्यातील पात्रुड येथील पत्रकार नईम आतार यांची कन्या शिफा आतार हिने शनिवार.दि. ७ मार्च २०२६ रोजी पवित्र रमजान महिन्यात वयाच्या ९ व्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने पूर्ण केला. बालवयामध्येच धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवून तिने हा रोजा पूर्ण केल्याने या बालिकेच्या कुटुंबीय व नातेवाईकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.शिफा नईम आतार ही बालिका इयत्ता ४ चोथी.



पान २ वर

## सौ.प्रभा कोठारी यांचे निधन

जामखेड दि ७ (प्रतिनिधी)– अहिल्यानगर येथील ड.अशोक कोठारी यांच्या धर्मपत्नी, डॉ. रमेश ,सुमतीलाल कोठारी यांच्या भाऊजाई आणि अतुल कोठारी, सौ.अर्चना राजेश लोढा घोटी, सौ अनिता राहुल बलई पुणे यांच्या मातोश्री व अक्षद अतुल कोठारी च्या आजी सौ. प्रभा अशोक कोठारी वय ७४ यांचे शनिवार दि.७ मार्च २०२६ दुपारी ४ वाजता दुःखद निधन झाले आज रविवार दि ८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या



पान २ वर

# शाळेचे गेट कोसळून विद्यार्थी जखमी

### विद्यार्थ्यांची सुरक्षा वाऱ्यावर



**बीड (प्रतिनिधी): शहरातील बार्शी नाका परिसरातील जिल्हा परिषद शाळेचे लोखंडी गेट कोसळल्याची धक्कादायक घटना शनिवारी घडली. शाळेचे लोखंडी गेट अचानक कोसळल्याने अर्शलान बागवान हा विद्यार्थी जखमी झाला आहे. जखमी विद्यार्थ्याला तातडीने बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार विद्यार्थी गेट उघडण्यासाठी धावत गेले असता अचानक शाळेचे गेट कोसळले. या दुर्घटनेत एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमी विद्यार्थ्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण



झाला होता. या घटनेमुळे शाळेतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. गेटची अवस्था जीर्ण असतानाही त्याची दुरुस्ती किंवा सुरक्षिततेची कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतण्याची वेळ आल्याची संतप्त प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त

पान २ वर

### बीड जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचे पेट्रोल कंपन्यांच्या समन्वयकांना पत्र

# पेट्रोल, डिझेलचा साठा राखीव ठेवा

**बीड (प्रतिनिधी) – युध्दाच्या पार्श्वभुमीवर गेल्या तीन–चार दिवसांपासून सर्वच पेट्रोल पंपावर ग्राहकांच्या रांगा लागत आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने गर्दी न करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर आता जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल कंपन्यांच्या समन्वयकांना पेट्रोल, डिझेलचा साठा राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य अनपेक्षित परिस्थितीत इंधन टंचाई निर्माण होऊ नये या उद्देशाने ही खबरदारी घेण्यात येत असल्याचे पत्रात नमुद करण्यात आले आहे.**



बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा शाखेच्या जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी बीडसह गेवराई, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर, केज, वडवणी, परळी, शिरूर कासार, आष्टी, पाटोदा येथील तहसीलदारांना देखील हे पत्र पाठवण्यात आले आहे. जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी बीपीसीएल, आयओसीएल, एचपीसीएल या कंपन्यांच्या जिल्हा समन्वयकांसह विक्री अधिकार्यांनाही दि.६ मार्च रोजी पत्र पाठवले आहे. सार्वजनिक वितरण व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत राहणे हे अत्यावश्यक असुन इंधन पुरवठा व्यवस्थेतील कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याचा परिणाम सर्व सामान्य नागरीक, शासकीय यंत्रणा तसेच आपत्तीकालीन सेवांवर होतो. त्या अनुषंगाने सर्व पेट्रोल पंपावर दैनंदिन विक्रीचा विचार करता पेट्रोल, डिझेलचा राखीव साठा कायमस्वरूपी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. विशेषत: नैसर्गिक आपत्ती, संप, वाहतूक अडथळे किंवा अन्य अनपेक्षित परिस्थितीत इंधन टंचाई निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याच्या सुचना पुरवठा अधिकार्यांनी दिल्या आहेत. पेट्रोल-डिझेलचा किमान राखीव साठा निर्धारित प्रमाणात कायम ठेवणे, साठ्यांची नोंद अद्यावत ठेऊन तपासणीसाठी उपलब्ध करून देणे आणि आपत्कालीन परिस्थितीत शासकीय यंत्रणेला प्राधान्याने इंधन पुरवठा करणे अशा सक्त सुचना जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी पेट्रोल कंपन्यांच्या जिल्हा समन्वयकांना दिल्या आहेत. सदरील सुचनांचे पालन न केल्यास सध्या लागू असलेल्या तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईलअशी तंबी देखील जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी सर्व पेट्रोल कंपन्यांचे समन्वयक, विक्री अधिकारी यांना दिली आहे.

## आतिफ खालेद शेख खालेद मोहम्मद शेख याचा पहिला रोजा संपन्न

बीड : शहरातील इस्लामपूरा बाबा चौक येथील आतिफ खालेद शेख खालेद मोहम्मद शेख याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. शुक्रवारी सायंकाळी त्याचा पहिला रोजा संपन्न झाला. सध्या उन्हाची तिव्रता जास्त असल्याने मोठमोठ्या लोकांनाही रोजाचा त्रास होतो.आतिफ खालेद शेख खालेद मोहम्मद शेख याने रोजा ठेवल्याने नातेवाईक व मित्र परिवाराने या दोघांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# आ.धस यांच्या मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल

### राज्यातील चार कृषी विद्यापीठांत ए आय सेंटरचा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर



पाटोदा दि.७(महेश बेदरे):–शेती क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आधारित कृषी माहिती केंद्रे उभारण्याची मागणी आमदार सुरेश धस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेत केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये 'ए आय सेंटर' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला. आ. धस यांनी दि. २८ फेब्रुवारी रोजी कृषी विषयावरील चर्चेत सहभाग घेताना शेतीत बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याची गरज अधोरेखित केली. प्रत्येक तालुक्यात एआय आधारित कृषी माहिती व मार्गदर्शन केंद्रे स्थापन केल्यास शेतकऱ्यांना हवामान अंदाज, पीक नियोजन, कीड–रोग नियंत्रण, बाजारभाव आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती तत्काळ उपलब्ध होईल, असे त्यांनी सभागृहात सांगितले. शेतीतील पाणी व्यवस्थापनाबाबत बोलताना त्यांनी पारंपरिक ठिबक सिंचन योजनांसोबतच अनुदानित माती आर्द्रता सेन्सर व स्मार्ट सिंचन प्रणाली शेतकऱ्यांना देण्याची मागणी केली. सेन्सरच्या मदतीने पाण्याचा नेमका वापर होऊन पाण्याची व विजेची बचत होईल आणि उत्पादनक्षमता वाढेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्य सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्णयानुसार

पान २ वर

## निमरा नवीद फारूखी व अफ्फान नुमान फारूखी यांचा पहिला रोज़ा पूर्ण

गेवराई (प्रतिनिधि):-येथील निमरा नवीद फारूखी यांची ८ वर्षीय मुलगी व अफ्फान नुमान फारूखी यांचा ७ वर्षी मुलगा आपल्या आयुष्याचा पहिला रोजा ठेवला.



शनिवार सायंकाळी त्याचा पहिला रोजा संपन्न झाला. सध्या उन्हाची तिव्रता जास्त असल्याने मोठमोठ्या लोकांनाही रोजाचा त्रास होतो. निमरा ८ वर्षीय व अफ्फान रोजा ठेवल्याने नातेवाईक व मित्र परिवाराने या दोघांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## पैठणच्या नाथ मंदिर परिसरात सोमवारी पाच लाख भाविक करणार सामुदायीक पठण

### गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणार

पैठण (प्रतिनिधी):- नाथषष्ठी यात्रा सोहळ्यात सहभागी ५ लाख भाविक वारकरी दि. ९ मार्च रोजी एकाच वेळी पसायदानचे सामुदायिक पठण करणार असून या विश्वविक्रमाची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये होणार आहे. मागील ९ वर्षांपासून विश्र्वशांतीसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी, व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांसह वारकरी संप्रदायाची बैठक घेण्यात आली. यात पुर्वतयारी करण्यात आली असून संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. नाथषष्ठी सोहळ्याचा यंदा ४२७ वा उत्सव साजरा होत आहे. दरम्यान विश्वशांती प्रार्थना समितीचे मुख्य संयोजक प्रा. चंद्रकात भराट यांच्या अध्यक्षतेखाली आज नाथमंदिरात बैठक घेण्यात आली. यावेळी पैठण नगर परिषद व नाथ संस्थान विश्वस्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विश्वशांती प्रार्थना कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली. जग सध्या तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे

पान २ वर

## मुंबई येथे शरद पवार राष्ट्रवादीची बैठक संपन्न

केज दि ७(प्रतिनिधी)– मुंबई येथील पक्ष कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खा. सुप्रिया ताई सुळे यांच्या उपस्थितीत पक्ष विस्ताराच्या दृष्टीने निवडक प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण संवाद बैठक पार पडली. अशी माहिती माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी कळवली आहे.

या बैठकीस उपस्थित राहून पक्ष संघटना अधिक मजबूत करणे, तळागाळातील कार्यकर्त्यांशी संवाद वाढवणे तसेच आगामी काळात पक्षाचा जनाधार अधिक व्यापक करण्याबाबत माझे मत



मांडले.यावेळी धाराशिव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख,युवती आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सक्षणाताई सलगर,तसेच पक्षाचे अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने पुढील काळात निश्चितच प्रभावी काम करू, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. अशी माहिती केज विधानसभेचे माजी आ.पृथ्वीराज साठे यांनी कळवली आहे.

## महाराष्ट्र परिट (धोबी) सेवा मंडळाची गेवराई तालुका कार्यकारिणी जाहीर

### तालुकाध्यक्षपदी अशोक मोताळे यांची बिनविरोध निवड

गेवराई दि.७ (प्रतिनिधी):–महाराष्ट्र परिट(धोबी) सेवा मंडळाची प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गेवराई तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. गेवराई येथील परिट (धोबी) समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते अशोक बाबुराव मोताळे यांची गेवराई तालुका अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बीड येथे महाराष्ट्र परिट(धोबी)सेवा मंडळाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत परिट(धोबी)सेवा मंडळाच्या संघटन वाढीसाठी चर्चा होवुन गेवराई तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. दरम्यान पदाधिकाऱ्यांच्या हस्ते अशोक मोताळे यांना निवडीचे पत्र देवुन तालुका अध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रधान पवार, माजी जिल्हाध्यक्ष मोहन राऊत, बीड तालुकाध्यक्ष बाबुराव भालेकर ,सचिव विक्रम वाघमारे ,जेष्ठ नेते आसाराम राऊत, सतीश मुळे, प्रदीप वाघमारे, विकास व्यवहारे, अहीलेश वाघमारे, सोपान राऊत, राहुल राऊत, तुषार कासार, लहुराव माकुडे सह आदि पदाधिकारी तसेच समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान नियुक्तीनंतर बोलताना अशोक मोताळे म्हणाले की, परिट (धोबी) सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. आगामी काळात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहीन. तसेच युवकांना मार्गदर्शन,



पान २ वर



बीड–मराठायोध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली, याप्रसंगी बीडचे आ.संदिप क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, विजय पवार आदी.

# गेवराई मतदार संघातील विकास कामांना ७२ कोटी रूपयाचा निधी मंजूर

गेवराई दि.७ (प्रतिनिधी) :– यंदाच्या अर्थसंकल्पात गेवराई विधानसभा मतदार संघातील ७२ कोटी १६ लक्ष रूपये किंमतीच्या विविध विकास कामांना निधीची तरतुद करण्यात आली आहे. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे विधानसभा निवडणूकी दरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होत आहे. रस्ते, इमारत बांधकाम यांसह सिंचन विषयक कामांचा यामध्ये समावेश आहे. आ.विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संबंधित विभागाचे मंत्री आणि महायुती सरकारचे आ.विजयसिंह पंडित यांनी आभार व्यक्त केले आहेत.गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना मंजूरीसह निधीची उपलब्धता व्हावी यासाठी आ.विजयसिंह पंडित सातत्याने प्रयत्नशील आहेत. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे यंदाच्या अर्थसंकल्पात गेवराई विधानसभा मतदार संघातील ७२ कोटी १६ लक्ष रूपये किंमतीच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. सिंदफणा नदीवरील टाकळगाव बॅरेज बांधकामासाठी १९.६६ कोटी रूपये, गेवराई शहरातील न्यायालयीन इमारतीवर पहिल्या मजल्यासह ४ कोर्ट रूम बांधकामासाठी १० कोटी रूपये, घोसापूरी ता.बीड येथे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय बांधकामासाठी १२.५१ कोटी रूपये, नाबार्ड अंतर्गत सिरसदेवी ते काजळ्याचीवाडी या रस्त्यावरील पुलाचे बांधकामासाठी १.९७ कोटी रूपये, लिंबारूई ते पाटेगाव या रस्त्यावरील पुलाच्या बांधकामासाठी ९९ लक्ष रूपये, भाटसांगवी–बऱ्हाणपूर ते वाकनाथपूर रस्त्यावर व्हेंटेड कॉजवे बांधकाम करण्यासाठी २ कोटी रूपये यासह मतदार संघातील विविध रस्त्यांच्या कामासाठी २५ कोटी रूपयांचा निधी मंजूर



पान २ वर

### माजलगावच्या माहेश्वरी महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम

# ७५ वर्षांवरील ज्येष्ठांचा केला सन्मान

माजलगाव दि.७(प्रतिनिधी)– येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन आणि होळीचे औचित्य साधून एका दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात समाजातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ महिलांचा सन्मान करून त्यांच्या अनुभवांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाची मंगलमयी सुरुवात प्रमुख पाहुण्या डॉ. काकानी मॅडम व बीड जिल्हा उपाध्यक्ष सौ. वर्षा भक्कड़ आणि सहसचिव सौ. माया चांडक



यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी महिलांच्या समाजातील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला. या सोहळयाला अध्यक्षा अलकनंदा मानधने, उपाध्यक्ष: वर्षा बजाज, सचिव: अनिता मुंदडा, सहसचिव: सुगुणा तेला, कोषाध्यक्ष: किरण कासट,सहकोषाध्यक्ष: सुरेखा जेथलिया, संघटन मंत्री: रत्नमाला इंदाणी यांचैसह स्नेह संपदा समितीच्या सदस्यांची देखील उपस्थिती होती. ७५ वर्षांवरील माऊलींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांचा झालेला यथोचित सन्मान हा या कार्यक्रमाचे खरे यश ठरले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी होळीचा सण पारंपरिक उत्साहात साजरा केला.

## बळीराजा पाणंद रस्ते योजनेसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करा –आ.विजयसिंह पंडित

गेवराई दि ७(प्रतिनिधी)–महायुती सरकारने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' सुरू केल्याबद्दल गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आ.विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्रावहिनी पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे आणि महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानले आहेत.शेतमाल सुरक्षित आणि वेळेवर बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी शेतरस्ते सुस्थितीत असणे गरजेचे असून, ही योजना त्यासाठी नक्कीच फलदायी ठरणार आहे.मात्र, शासनाने या योजनेची आखणी करताना निधीची वेगळी तरतूद केलेली नसल्यामुळे याच्या प्रभावी अंमलबजावणीत अडचणी येऊ शकतात. सद्यस्थितीतील अपुरी तरतूद पाहता शेतकऱ्यांच्या मागणी नुसार शेतरस्ते निर्माण होऊ शकणार नाहीत.त्यामुळे या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करून निधीची विशेष तरतूद करावी, अशी आग्रही मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी आज नियम २९३ अन्वये झालेल्या चर्चेच्या निमित्ताने विधानसभेत केली.

## महिला दिनी होणार परळीतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव–कुलकर्णी

परळी दि.७(प्रतिनिधी):– जागतिक महिला दिनानिमित्त परळी शहरात विविध क्षेत्रात कार्य करणार्या कर्तृत्ववान महिलांचा सा.परळी संचारच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे. परळी संचारचे संपादक अनंत शामराव कुलकर्णी यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे.

परळीच्या सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, वैद्यकिय अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या अकरा कर्तृत्ववान महिलांचा सा.परळी संचारच्या वतीने महिला दिनी येत्या रविवारी ८ मार्चला गौरव करण्यात येणार आहे. त्यात नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, डॉ.शालीनी बालासाहेब कराड, सौ.शर्मिला अशोक जैन, सौ.वर्षाराणी लक्ष्मणराव हाके, नगरसेविका सौ.अर्चना महेंद्र रोडे, सौ.सुमन लक्ष्मण वाकडे, श्रीमती दुर्गा वैजनाथ दहातोंडे सौ.गौरी सुनील जोशी, कु.राधिका रामप्रसाद शर्मा, स्नेहा एकनाथ बनसोडे, जनाई महाराज कोकाटे आदी महिलांचा यानिमित्ताने गौरव करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप

पान २ वर

CMYK